# मुंबई विद्यापीठ

**अधिसभा इतिवृत्त**

क्र.का.प्रा.वि/आयसीडी/२०२४-२५/१३६ दिनांक: २० जुलै,२०२४

विद्यापीठाची सर्वसाधारण अधिसभा शनिवार दिनांक २० जुलै, २०२४ सौर दिनदर्शिकेनुसार २९ आषाढ, शके १९४६ रोजी सकाळी १०:३० वाजता कावसजी जहांगीर दिक्षांत सभागृह येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत खालील मान्यवर उपस्थित होते.

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (कुलगुरू) | उपस्थित |
| २ | डॉ. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | उपस्थित |
| ३ | प्रा. अनिल सिंग | उपस्थित |
| ४ | प्रा. शिवराम एस. गर्जे | उपस्थित |
| ५ | प्रा. कविता लघाटे | उपस्थित |
| ६ | प्रा. अनिल कुमार सिंग | अनुपस्थित |
| ७ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | उपस्थित |
| ८ | (सी.ए.) हर्षल सुभाष वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | उपस्थित |
| ९ | प्रा. डॉ. किशोर सुखतनकर | उपस्थित |
| १० | डॉ. अद्वैत एम वैद्य | उपस्थित |
| ११ | श्री. श्रीपाद एस वेलिंग | उपस्थित |
| १२ | डॉ. सचिन लढ्ढा | उपस्थित |
| १३ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १४ | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १५ | डॉ. नंदकिशोर रा. मोतेवार | उपस्थित |
| १६ | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित |
| १७ | डॉ. दिलीप लक्ष्मण भारमल | उपस्थित |
| १८ | डॉ विद्यागौरी विवेक लेले | उपस्थित |
| १९ | डॉ वसंत पंडित माळी | उपस्थित |
| २० | डॉ दिपक प्रल्हाद रावेरकर | उपस्थित |
| २१ | डॉ. गजानन पंडित वडेर | उपस्थित |
| २२ | डॉ. अनिता एसएस कनवर | उपस्थित |
| २३ | डॉ उत्तम ज्ञानू कोळेकर | उपस्थित |
| २४ | श्री. रविंद्र नारायण घोडविंदे | उपस्थित |
| २५ | श्री. सुनिल मधुसुदन जोशी | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| २६ | श्री लखम खेम सावंतभोसले | उपस्थित |
| २७ | श्री संजय बाबुराव शेटे | अनुपस्थित |
| २८ | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन | अनुपस्थित |
| २९ | डॉ चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी | उपस्थित |
| ३० | डॉ विजय नामदेव पवार | उपस्थित |
| ३१ | डॉ सत्यवान सुधाकरराव हाणेगवे | उपस्थित |
| ३२ | प्रा. जितेंद्रनाथ गोकुळनाथ झा | उपस्थित |
| ३३ | डॉ अनुप नरेंद्र पळसोकर | उपस्थित |
| ३४ | डॉ सोमनाथ दत्तात्रय कदम | उपस्थित |
| ३५ | डॉ सखाराम शिवाजी डाखोरे | उपस्थित |
| ३६ | डॉ हनुमंत एकनाथ सुतार | उपस्थित |
| ३७ | डॉ जगन्नाथ किसान खेमनर | उपस्थित |
| ३८ | डॉ शांती येसूदास पोलामुरी | उपस्थित |
| ३९ | डॉ विश्वबर वसंत जाधव | उपस्थित |
| ४० | डॉ वंदना नाथू महाजन | उपस्थित |
| ४१ | डॉ विनोद लक्ष्मणराव कुमरे | उपस्थित |
| ४२ | डॉ किरण रघुनाथ लेले | उपस्थित |
| ४३ | ॲड.अशिष चव्हाण | उपस्थित |
| ४४ | श्री संतोष परब | अनुपस्थित |
| ४५ | श्रीमती वर्षा परचुरे | उपस्थित |
| ४६ | श्री चैत्यन गिरी | अनुपस्थित |
| ४७ | श्री सुशिलकुमार एस. जाजू | उपस्थित |
| ४८ | श्री भूषण मर्दे | उपस्थित |
| ४९ | श्री मयूरेश पंढरीनाथ नेतकर | उपस्थित |
| ५० | श्रीमती रूचि माने | उपस्थित |
| ५१ | श्री धनेश सावंत | उपस्थित |
| ५२ | श्री सुनील राणे | अनुपस्थित |
| ५३ | श्रीमती वर्षा गायकवाड | अनुपस्थित |
| ५४ | श्री विलास पोतनीस | अनुपस्थित |
| ५५ | डॉ. बळीराम नामदेव गायकवाड (सदस्य सचिव) | उपस्थित |

सभेची सुरुवात ‘वंदे मातरम’ या गीताने झाली, त्यानंतर महाराष्ट्र राज्य गीत व मुंबई विद्यापीठ गीत सभागृहात सादर करण्यात आले.

श्रद्धांजली

## डॉ. रघुनंदन मुजुमदार

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण मेडिकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ. रघुनंदन मुजुमदार यांचे दिनांक २४ मार्च, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

## डॉ. जयश्री अय्यर

वडाळा येथील डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री अय्यर यांचे दिनांक २६ मार्च, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

## लवराज कांबळी

मालवणी नटसम्राट म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ मालवणी अभिनेते लवराज कांबळी यांचे दिनांक २६ मार्च,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते.

## मिलिंद बेल्हे

ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बेल्हे यांचे दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५६ वर्षांचे होते.

## मीनाक्षी पाटील

माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांचे दिनांक २९ मार्च,२०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.

## अरुणा साधू

स्त्रीमुक्ती चळवळीच्या माध्यमातून कार्यरत सामाजिक कार्यकर्त्या अरुणा साधू यांचे दिनांक २९ मार्च,२०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७४ वर्षांच्या होत्या.

## सुधीर पुराणिक

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. सुधीर पुराणिक यांचे दिनांक ०३ एप्रिल,२०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते.

## डॉमनिक गोन्सालविस

माजी आमदार डॉमनिक गोन्सालविस यांचे दिनांक ०७ एप्रिल,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**प्रमोद माने**

ज्येष्ठ पत्रकार प्रमोद माने यांचे दिनांक ०८ एप्रिल,२०२४ रोजी अल्पषा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षांचे होते.

**मीना चंदावरकर**

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, लेखिका मीना चंदावरकर यांचे दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी वृध्दापकाळाने आणि अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

**शिवाजीराव जोंधळे**

जोंधळे नॉलेज सिटीचे संस्थापक शिवाजीराव जोंधळे यांचे दिनांक १९ एप्रिल,२०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

**धीरुभाई मेहता**

वैद्यकीय सेवेला गांधीवादी विचारांच्या कसोटीवर तपासून आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कामगिरी बजावणारे जेष्ठ गांधीवादी धीरुभाई मेहता यांचे दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

**दादा परसरनाईक**

मराठी रंगभूमीवरील प्रसिध्द पार्श्वसंगीतकार दादा परसरनाईक यांचे दिनांक २७ एप्रिल,२०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**दिलीप नाईक**

ज्येष्ठ दिग्दर्शक दिलीप नाईक यांचे दिनांक ०७ मे, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

**सतीष जोशी**

मराठी मनोरंजनसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते सतीष जोशी यांचे दिनांक १२ मे,२०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते.

**डॉ. दामोदर नेने**

प्रख्यात स्तंभलेखक आणि लेखक डॉ. दामोदर नेने उर्फ दादूमिया यांचे दिनांक २१ मे, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**पी. एन. पाटील**

ज्येष्ठ नेते, करवीरचे आमदार पांडुरंग निवृत्ती पाटील उर्फ पी. एन. पाटील यांचे दिनांक २३ मे, २०२४ रोजी आकस्मित निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**यशवंतराव पेंढारकर**

विको लॅबोरेटरीचे चेअरमन यशवंतराव पेंढारकर यांचे दिनांक २४ मे,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**पांडुरंग सकपाळ**

शिवसेना ठाकरे गटाचे दक्षिण मुंबईतील माजी विभागप्रमुख पांडुरंग सकपाळ यांचे दिनांक २५ मे,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षांचे होते.

**अशोक रानडे**

ज्येष्ठ पत्रकार अशोक श्री. रानडे यांचे दिनांक २५ मे,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

**मधू गोयल**

लष्करी अधिकाऱ्यांच्या पुण्यातील सेवाभावी संस्थेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या मधू गोयल यांचे दिनांक २६ मे,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या.

**अल्बर्ट रूडी**

ऑस्कर पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते अल्बर्ट एस. रूडी यांचे दिनांक २९ मे,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**प्रभा शिवणेकर**

लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचे दिनांक १ जून,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या.

**चंद्रकांत कपिलेश्वरी**

किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक आणि रचनाकार पंडित चंद्रकात कपिलेश्वरी यांचे दिनांक २ जून, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**विल्यम ॲडर्स**

माजी अंतराळवीर विल्यम ॲडर्स यांचे दिनांक ८ जून, २०२४ रोजी विमान अपघातात निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते.

**रामोजी राव**

दिग्गज माध्यमकर्मी आणि रामोजी ग्रुपचे अध्यक्ष सीएच रामोजीराव यांचे दिनांक ८ जून,२०२४ रूग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते.

**अमोल काळे**

मुंबई क्रिकेट संघाचे अध्यक्ष अमोल काळे यांचे दिनांक १० जून,२०२४ रोजी न्युयॉर्क येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ४७ वर्षांचे होते.

**मधू देवळेकर**

ज्येष्ठ भाजप नेते व माजी आमदार मधू देवळेकर यांचे दिनांक १२ जून, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**माधव जोशी**

ठाणे येथील प्रकाशक माधव जोशी यांचे दिनांक १३ जून,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**टी. पी. कांबळे**

भाजपचे माजी आमदार टी. पी. कांबळे यांचे दिनांक १६ जून, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**आचार्य लक्ष्मीकांत दीक्षित**

अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा करणारे मुख्य आचार्य लक्ष्मीकांत दीक्षित यांचे दिनांक २२ जून,२०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८६ वर्षांचे होते.

**शिरीष सप्रे**

कोल्हापुरातील प्रसिध्द उद्योजक शिरीष सप्रे यांचे दिनांक २६ जून,२०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षांचे होते.

**संभाजी महाराज मोरे**

संत तुकाराम महाराजांचे वंशज, संस्थानचे माजी विश्वस्त संभाजी महाराज मोरे देहूकर यांचे दिनांक २६ जून,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७६ वर्षांचे होते.

### प्रेमाताई पुरव

'अन्नपूर्णा महिला मंडळ' व 'अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक' आणि गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसेनानी प्रेमाताई पुरव यांचे दिनांक ०२ जुलै, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या.

### डॉ. विद्युत भागवत

स्त्रीवादी चळवळीतील ज्येष्ठ लेखिका-कार्यकर्त्या आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील स्त्री अध्ययन केंद्राच्या माजी संचालिका डॉ. विद्युत भागवत यांचे दिनांक ११ जुलै,२०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.

### रफत कुरेशी

छत्रपती संभाजीनगरच्या इतिहासावर सातत्याने प्रकाश टाकणारे उर्दू लेखक व इतिहास तज्ज्ञ रफत कुरेशी यांचे दिनांक १२ जुलै,२०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते.

### सुभाष दांडेकर

कॅम्लिन फाइन सायन्सेस चे संस्थापक व कोकुयो कॅम्लिन चे मानद अध्यक्ष सुभाष दांडेकर यांचे दिनांक १५ जुलै, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

### सुनीती जैन

ज्येष्ठ लेखिका सुनीती जैन यांचे दिनांक १६ जुलै,२०२४ रोजी अल्पशा निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.

### अरुण ठाकूर

युवक क्रांती दलाचे नेते अरुण ठाकूर यांचे १७ जुलै,२०२४ रोजी अप्लशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

### एस. एन. इनामदार

मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील व वरिष्ठ कर सल्लागार श्रीकृष्ण नरहर इनामदार यांचे १८ जुलै,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

### विवेक वाघ

राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक विवेक वाघ यांचे १८ जुलै,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५४ वर्षांचे होते.

या सर्व महान व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थासाठी अनमोल योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कला इत्यादी क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तीचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. असे निवेदन प्रा बळीराम गायकवाड, प्रभारी कुलसचिव यांनी केले व श्रद्धांजलीचा प्रस्ताव मांडला.

वरील सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगताना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तदनंतर नियमित कामकाजाला सुरुवात झाली.

**कुलसचिवांनी विकासात्मक वृत्तांत सभेसमोर सादर केला.**

- मुंबई विद्यापीठाचा १६८ वा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्थापना दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या वर्धापन दिन व्याख्यानमालेतील १० वे पुष्प मुंबई पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर यांनी गुफले. सर्वोत्तमतेचा ध्यास घेण्याचा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.
- क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये देशातील सर्वोत्तम २० शिक्षण संस्थाच्या यादीत मुंबई विद्यापीठाची मोहोर उमटली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये आशियातील सर्वोत्तम शिक्षण संस्थाच्या यादीत मुंबई विद्यापीठाने ६७ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. तर राज्यातील पारंपारिक विद्यापीठाच्या यादीत द्वितीय स्थान पटकावले आहे. क्वाकरेली सायमंड ( क्यूएस) यांनी जगासह देशातील सर्वोत्तम शिक्षण संस्था आणि विद्यापीठांची यादी जाहीर केली असून या यादीमध्ये मुंबई विद्यापीठाची कामगिरी सर्वोत्तम आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत विद्यापीठाने वर्ल्ड रँकिंगमध्ये मोठी सुधारणा केली असून १००१ – १२०० च्या क्रमवारीच्या बँडमधून यावर्षी ७११-७२० बँडमध्ये प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे विषयनिहाय क्रमवारीत मुंबई विद्यापीठाने जागतिक क्रमवारीत १०१-१५० या बँडमध्ये प्रवेश केला आहे.
- मुंबई विद्यापीठाचे दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र व शारीरिक शिक्षण विभाग यांच्यासमवेत केंद्र शासनाच्या युवक आणि क्रीडा मंत्रालयाचे महाराष्ट्र व गोव्याचे नेहरू युवा केंद्र व स्मार्ट कम्युट फाऊंडेशन, मुंबई यांच्या सहकार्याने जागतिक सायकल दिनानिमित्त 'पेडल अप मुंबई ' सायकल रॅली आयोजित करण्यात आली. या सायकल रॅलीत ६०० पेक्षा जास्त सायकलस्वार सहभागी झाले होते.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती समारंभाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाचे लोकमान्य टिळक अध्यासन केंद्र, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र आणि समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस उपस्थित होते.मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी

जहाँगीर दीक्षान्त सभागृह फोर्ट मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विवेकानंद एज्युकेशन सोसायटीज इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् अँड रिसर्चचे संचालक प्रा. सतीश मोढ, समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेशचे कोषाध्यक्ष श्री. धीरज बोरीकर, मुंबई विद्यापीठाचे प्र- कुलगुरु प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार मुंबई विद्यापीठाने एनईपीनुसार नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले. यात १६,३४३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. यांची प्रथम सत्राची परीक्षा होऊन निकालही जाहीर झाले व या विद्यार्थ्यांची डिजिटल गुणपत्रिका त्यांच्या लॉगिनमध्ये तसेच डिजीलॉकरवरही ऑनलाईन उपलब्ध करून दिली आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना देशात तसेच परदेशात होणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण पूर्णपणे अंमलबजावणी करणारे मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रात सर्वप्रथम आहे. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठेही मुंबई विद्यापीठाचे अनुकरण करीत आहेत.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी पदवीच्या ३ आणि ४ वर्षीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठाची प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार व महाराष्ट्र शासनाच्या २० एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयानुसार ३ वर्षीय पदवी अभ्यासक्रम, ४ वर्षीय ऑनर्स/ ऑनर्स विथ रिसर्च, पाच वर्षीय इंटिग्रेटेड प्रोग्राम्स विथ मल्टीपल एन्ट्री अँड मल्टीपल एक्जिट या अनुषंगाने ही प्रवेश प्रक्रिया राबवली गेली. २५ मे २०२४ पासून सुरु केलेल्या प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून एकूण २ लाख ५० हजार ४५३ विद्यार्थ्यांनी प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणी केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी विविध अभ्यासक्रमांसाठी ८ लाख ७० हजार ५९५ एवढे अर्ज सादर केले आहेत. विद्यापीठाने निर्गमित केलेल्या वेळापत्रकानुसार व प्रचलित नियमानुसार ही प्रवेश प्रक्रिया महाविद्यालयांमार्फत राबवली गेली.
- मुंबई विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली. राज्यात सर्वात आधी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया मुंबई विद्यापीठाद्वारे राबविण्यात आली.
- मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागातील विद्यार्थ्यांना कार्यांतर्गत प्रशिक्षणाच्या (ऑन जॉब ट्रेनिंग) माध्यमातून मिळालेल्या अनुभवातून विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. प्रत्यक्ष व अनुभवाधारीत मिळालेल्या शिक्षणातून कौशल्यवृद्धी झाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, बॉम्बे नेच्युरल हिस्ट्री सोसायटी आणि ज्ञानस्त्रोत केंद्र मुंबई विद्यापीठ येथे ऑन जॉब ट्रेनिंगच्या माध्यमातून प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना क्युरेटर, गाईड, संग्रहालय प्रदर्शनाचे आयोजन, कागदपत्रे जतन व संवर्धनाचे तांत्रिक ज्ञान, संग्रहालय व संग्रह व्यवस्थापन, वारसा संवर्धन, अभ्यागत सर्वेक्षण, जर्नल प्रकाशन, ग्रंथालयातील कामे, कंटेन्ट तयार करणे, समाज माध्यमांसाठी आशय तयार करणे या अनुषंगिक बाबींचे प्रत्यक्ष प्रशिक्षण त्यांना मिळाले असल्याचे विविध विद्यार्थ्यांनी सांगितले.

- सार्वत्रिक निवडणूक २०२४ या अनुषंगाने सर्व सामान्य जनता व विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता व्हावी याकरिता मुंबई विद्यापीठाने विविधांगी कार्यक्रमांचे आयोजन करून लक्षणीय कामगिरी केली आहे. भारत निवडणूक आयोग आणि शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार मुंबई विद्यापीठाने मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या सहकार्याने गेल्या सहा महिन्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून निवडणूक साक्षरता वाढीस लावण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे.
- मुंबई विद्यापीठात या शैक्षणिक वर्षापासून मंदिर व्यवस्थापनाच्या अभ्यासक्रमाला सुरुवात करण्यात आली आहे. विद्यापीठातील हिंदू अध्यासन केंद्राच्या पुढाकारातून मंदिर व्यवस्थापन विषयात ६ महिन्यांचे प्रमाणपत्र आणि १२ महिन्यांचे पदविका अभ्यासक्रम राबविले जात आहेत. नुकतेच मुंबई विद्यापीठाचे हिंदू अध्यासन केंद्र आणि टेम्पल कनेक्ट या संस्थेत सामंजस्य करार करण्यात आला. सर्वसामान्यांमध्ये मंदिराचे व्यवस्थापन, प्रशासन आणि संघटन याविषयी जागृती व्हावी अशा व्यापक दृष्टिकोनातून या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. मंदिर व्यवस्थापन या अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान परंपरा, व्यवस्थापन शास्त्राची महत्वाची सूत्रे व तत्वे, स्थापत्य, गर्दीचे व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वित्त व्यवहार, माहिती व तंत्रज्ञानाचा वापर आणि पर्यावरण व परिसरपूरक अशा अनुषंगिक विषयावर या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून प्रकाश टाकला जाणार आहे. विशेष म्हणजे या प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रमात ३ महिन्यांचे कार्यांतर्गत प्रशिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहे. ज्यामध्ये मुंबईसह महाराष्ट्र आणि देशातील विविध मंदिरांमध्ये प्रत्यक्ष अनुभवाधारित प्रशिक्षण उपलब्ध होऊ शकेल.
- मुंबई विद्यापीठातील हिंदू अध्यासन केंद्र, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र, प्रा. बाळ आपटे विद्यार्थी व युवा चळवळी अभ्यास केंद्र आणि श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रांचे बळकटीकरण केले जात आहे. विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या या चारही अध्यासन केंद्रांसाठी विद्यापीठामार्फत कलिना संकुलातील रामकृष्ण बजाज भवन (संस्कृत भवन) येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नुकतेच या चारही अध्यासन केंद्राच्या स्वतंत्र जागेचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. रामकृष्ण बजाज संस्कृत भवन येथे स्थलांतर होत असलेल्या या अध्यासन केंद्राना स्वतंत्र अभ्यासवर्ग खोल्या, सेमिनार हॉल, प्रशासकीय कार्यालये आणि ग्रंथालयांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचबरोबर पायाभूत सुविधांसह सुसज्ज यांत्रिकी उपकरणे आणि आवश्यक मनुष्य बळ मानव संसाधन विभागामार्फत पुरविला जात आहे.
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ७९ अन्वये मुंबई विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या अध्यापक आणि कर्मचारी तक्रार निवारण समीतीने अल्पावधीतच १२७ तक्रारींचा जलदगतीने निपटारा केला आहे. तक्रार निवारण समितीने अध्यक्ष म्हणून काम पाहणारे सेवानिवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री. शशिकांत सावळे यांनी तक्रार निवारण समीतीकडे दाखल करण्यात आलेल्या विविध तक्रारींवर निर्णय देऊन त्या निकाली काढल्या आहेत.

- मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय नॅनोविज्ञान आणि नॅनोतंत्रज्ञान केंद्रात पदार्थ विज्ञान आणि नॅनो तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन करणारे डॉ. प्रवीण वाळके यांना फ्रान्सच्या नॉर्मंडी येथील प्रतिष्ठित केन विद्यापीठात संशोधनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. फ्रान्सच्या केन विद्यापीठामार्फत दरवर्षी जगभरातील ५ ते ६ प्राध्यापकांची अभ्यागत प्राध्यापक म्हणून निवड केली जाते. डॉ. प्रवीण वाळके यांनी फ्रान्स शासनाच्या केंद्रीय ज्ञान शोध संस्थेचे संचालक व जगप्रसिद्ध संशोधक आणि वैज्ञानिक डॉ. विल्फ्रिड प्रेलियर, सीएनआरएस यांच्यासोबत संशोधनाचे कार्य केले आहे. येथील संशोधनाचा मुंबई विद्यापीठ आणि आंतराष्ट्रीय सहयोगासाठी विशेष लाभ होणार आहे. डॉ. वाळके यांनी यापूर्वी या संस्थेत युरोपमधील मानाच्या समजल्या जाणाऱ्या मेरी क्युरी शिष्यवृत्ती अंतर्गत येथे संशोधनाचे कार्य केले आहे.
- विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने सुरू केलेला विद्यार्थी संवाद हा उपक्रम प्रभावी माध्यम ठरत आहे. निकाल, राखीव निकाल, पुनर्मूल्यांकन, छायांकीत प्रत आणि गुणपत्रिका अशा अनुषंगिक तक्रारींचे निवारण जलदगतीने आणि तात्काळ होत आहे.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे १९२३ ला सादर केलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या डी.एस्सी प्रबंधाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आणि महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या स्मरणार्थ मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी (स्वायत्त), मुंबई विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर इन पॉलिटिकल इकॉनॉमी, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आणि इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स फॉर अफर्मेटिव्ह ॲक्शन (ICCAA) यांच्या संयुक्त विद्यमाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताचे संविधान आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान' या विषयावर नॅशनल स्टॉक एक्स्चेंज मुंबई येथे एक दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली होती. एकूण चार सत्रात पार पडलेल्या या परिषदेसाठी एनएसईचे एमडी आणि सीईओ डॉ. आशिष चौहान, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स पुणे येथील कुलगुरू डॉ. अजित रानडे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, आयसीसीएएचे अध्यक्ष सुनील झोडे, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसीच्या संचालिका प्रा. मनिषा कर्णे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.
- मुंबई विद्यापीठाच्या अब्जांश विज्ञान आणि अब्जांश तंत्रज्ञान (नॅनोसायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी) विभागात या शैक्षणिक वर्षापासून एम.टेक इन नॅनो सायन्स अँड नॅनोटेक्नोलॉजी या विषयातील दुहेरी पदवी मिळणार आहे. या दुहेरी पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी मुंबई विद्यापीठाने अमेरिकेतील प्रतिष्ठित इंडियाना विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला आहे. एम. टेक इन नॅनो सायन्स अँड नॅनोटेक्नोलॉजी या विषयातील दुहेरी पदवीसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना तिसऱ्या आणि चौथ्या सत्राचे शिक्षण इंडियाना विद्यापीठात घेता येईल, त्याचबरोबर तेथील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात तिसऱ्या आणि चौथ्या सत्राचे शिक्षण घेता येईल. विशेष म्हणजे इंडियाना विद्यापीठात पी.एचडी. आणि

पोस्ट डॉक्टरेट करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्णपणे अनुदानित शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे. दुहेरी पदवी कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळणार असून आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या या दुहेरी पदवीमुळे प्रत्येक संस्थेच्या सामर्थ्याचा आणि कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टता वृध्दीस हातभार लागणार आहे.

- इटलीतील रोममध्ये पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मुंबई विद्यापीठाच्या प्राध्यापकांना आमंत्रीत करण्यात आले होते. दि.२९ मे ते ४ जून २०२४ दरम्यान 'एकात्म मानव परिवार' या विषयावर आयोजित केलेल्या या परिषदेमध्ये मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका आणि हिंदू अध्ययन केंद्राच्या उप-संचालिका डॉ. माधवी नरसाळे, तत्त्वज्ञान विभागाच्या प्राध्यापिका व विभाग प्रमुख डॉ. प्रिया वैद्य आणि डॉ. मीनल कातर्णीकर, तसेच बहिशाल केंद्राच्या सहाय्यक प्राध्यपिका डॉ. प्राची मोघे या सहभागी झाल्या होत्या.
- मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. बाळकृष्ण भोसले यांना इटलीतील प्रतिष्ठित पॉलिटेक्निक यूनिवर्सिटी ऑफ मार्शीकडून अभ्यागत प्राध्यापक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. २० ते ३० मे २०२४ या दरम्यान पॉलिटेक्निक विद्यापीठाच्या अर्थशास्त्र आणि सामाजिक शास्त्र विभागामार्फत आयोजित केलेल्या सेमिनारमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. 'अँडरस्टंडिंग डेवलपमेंट इन इंडिया: बैलेंसिंग एक्स्पांशन अँड सस्टेनबिलीटी' आणि 'द लेबर मार्केट इन इंडिया अँड सोशिओ एनव्हायरनमेंटल सस्टेनबिलीटी' हे त्यांच्या व्याखानाचे विषय होते.
- उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने वाटचाल करताना मुंबई विद्यापीठाने आघाडी घेत युकेमधील प्रतिष्ठित विद्यापीठांशी शैक्षणिक सामंजस्य करार करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यामध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, एसओएएस युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, एसओएएस शापूरजी पालनजी इन्स्टिट्यूट ऑफ झोरोस्ट्रियन स्टडीज, ऑक्सफोर्ड विद्यापीठ आणि कॅम्ब्रिज विद्यापीठ अशा प्रतिष्ठित विद्यापीठ आणि उच्च शिक्षण संस्थांचा समावेश आहे. नुकत्याच मुंबई विद्यापीठाच्या शिष्टमंडळाच्या वतीने कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहचर्य व विद्यार्थी सहाय्य केंद्राचे समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी या विद्यापीठांना भेटी देऊन तेथील प्रतिनिधींशी उच्च शिक्षणातील विविध संधींवर चर्चा करून शैक्षणिक सामंजस्य करार करण्यासाठी स्वारस्य दाखवले.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे १९२३ ला सादर केलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ रूपीः इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन' या डी.एस्सी प्रबंधाच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने लंडन येथे 'शाश्वतता, सर्वसमावेशक विकास आणि डॉ. बी. आर. आंबेडकर' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, बार्टीचे महासंचालक श्री. सुनिल वारे, लंडन स्थित अभ्यासक आणि अनिवासी भारतीय श्री. गंगावणे, लॅरी क्रामेर, अध्यक्ष आणि कुलगुरू लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, लॉर्ड निकोलस स्टर्न, आयजी पटेल प्रोफेसर ऑफ

इकॉनॉमिक्स अँड गव्हर्नमेंट अँड को-चेअर इंडिया, डॉ. रुथ कुट्टुमुरी, को-चेअर इंडिया ऑब्झर्वेटरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ. मनिषा करणे, सुजीत घोष, उपउच्चआयुक्त, भारतीय उच्चआयुक्तालय, डॉ. शंतनू सिंह, संशोधक, इंडिया ऑब्जर्वेटरी, डॉ. सुप्रिया कामथ, डॉ. नियथी कृष्णा, श्रीमती एलिजाबेथ रायन आणि मानस गोयल यांच्यासह विविध मान्यवर आणि लंडन आणि भारतातून ६४ संशोधक उपस्थित होते. १३ आणि १४ एप्रिल २०२४ या दोन दिवस चाललेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'शाश्वतता, सर्वसमावेशक विकास आणि डॉ. बी. आर. आंबेडकर' या विषयाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदान, प्रगाढ ज्ञान आणि समकालीन संशोधन आणि आर्थिक धोरणांशी त्यांची प्रासंगिकता यावर शंशोधक आणि धोरणकर्त्यांना या परिषेदेच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय शिक्षण व्यवस्थेसंबंधी मांडणी, विशेषतः उच्च शिक्षणाच्या सर्वच ज्ञानशाखात समाजहितैषि "विद्यार्थी घडवणे" या प्रणालीस निती मानून त्यानुरूप शैक्षणिक व्युहरचना करून व तीस अनुरूप अशा अध्यापन व अध्ययन पद्धतीचा अवलंब केल्यास प्रबुद्ध, प्रशिक्षित व वाकबगार विद्यार्थी निर्माण केले जावू शकतात आणि अशी सुज्ञ माणसे स्वत: बरोबरच, समाज व देशाला प्रगतीपथावर नेण्यात जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्वाची भुमिका बजावत आपली कर्तबगारी सिद्ध करू शकतात, अशा परिवर्तनशील क्रांतिकारी विचारांची मांडणी ते मुंबई विद्यापीठातील महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच शिक्षक म्हणून तसेच विद्यापीठाच्या परीक्षांचे परिक्षक म्हणून काम करत असताना, केली आहे असे प्रतिपादन प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू मगरे यांनी केले. आजच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात समाविष्ट असलेल्या अनेक उल्लेखनीय तरतुदी बाबासाहेबांनी यापूर्वी विशद केल्या असून त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील या महत्त्वपूर्ण योगदानामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक थोर शिक्षण शास्त्री म्हणूनची ओळख अधोरेखित होते असेही ते म्हणाले. मुंबई विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थितांशी संवाद साधत होते. मुंबई विद्यापीठाच्या वतीने महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. जयंती सप्ताहाच्या निमित्ताने विद्यापीठामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने आघाडी घेत दुहेरी पदवीच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला आहे. याअनुषंगाने आता मुंबई विद्यापीठात विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचे शिक्षण मिळणार आहे. मुंबई विद्यापीठाने अमेरिकेतील प्रतिष्ठित सेंट लुईस विद्यापीठासोबत शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. या शैक्षणिक वर्षापासून माहिती तंत्रज्ञान विभागात एम.एस. इन डेटा एनालॅटिक्स या अभ्यासक्रमासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण मुंबई विद्यापीठात तर द्वितीय वर्षाच्या दोन सत्राचे शिक्षण सेंट लुईस विद्यापीठात मिळणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना कार्यांतर्गत प्रशिक्षण आणि इंटर्नशिपही करता येणार आहे. विशेष म्हणजे दुहेरी पदवी कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांस दोन्ही विद्यापीठाची पदवी मिळणार आहे.
- ३७ व्या आंतर विद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी करत ७ सुवर्ण पदके, ४ रौप्य आणि २ कांस्य पदके जिंकली आहेत. या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये मुंबई

विद्यापीठाने एकूण ८५ गुणांची कमाई केली आहे. भारतीय विद्यापीठे संघ (एआययु) यांच्या निर्देशानुसार २८ मार्च ते १ एप्रिल २०२४ या दरम्यान पंजाब ॲग्रिकल्चरल यूनिव्हर्सिटी, लुधियाना, पंजाब येथे या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात देशातील १३७ विद्यापीठे सहभागी झाली होती.

- उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकत मुंबई विद्यापीठाने रशियातील मास्को स्टेट विद्यापीठाशी शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. या करारान्वये दोन्ही विद्यापीठांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक आदान –प्रदान, विविध विद्याशाखातील शैक्षणिक कार्यक्रम, विविध ज्ञानशाखांत संशोधन, सह सांस्कृतिक कार्ये आणि शैक्षणिक साहित्य-संसाधन निर्मिती व हस्तांतरण अशा विविध क्षेत्रातील संधीचे दालन यानिमित्ताने खुले होणार आहे. मुंबई विद्यापीठ आणि मास्को स्टेट विद्यापीठ रशिया या उच्च शिक्षण संस्थामध्ये झालेल्या करारानुसार दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापक आणि संशोधक परिषदा, कार्यशाळा आणि व्याख्यानात सहभागी होऊ शकतील तसेच अध्ययन आणि संशोधनासाठी एकत्रिक कार्य करू शकतील. याच कराराच्या अनुषंगाने स्मार्ट डिजीटल लर्निंग, सांस्कृतिक समन्वय आणि सहकार्यासाठी मुंबई विद्यापीठात व्याख्यान कक्षाच्या निर्मितीसाठी मास्को स्टेट विद्यापीठाने स्वारस्य दाखवले आहे.
- गुणवत्ता, सर्वासमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देत मुंबई विद्यापीठाचा २०२४- २५ या वित्तीय वर्षाचा रुपये ८५७ कोटींचा अर्थसंकल्प वार्षिक अधिसभेत मंजूर करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १२१ कोटी ६० लाखांची तूट दाखविण्यात आली आहे. २०२४- २५ वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरण, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार, विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम, माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ- औद्योगिक साहचर्य उपक्रम यासह शैक्षणिक आणि गव्हर्नंस उत्कृष्टता उपक्रमांसाठी ६५ कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, विद्यार्थी विभाग आणि श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रामार्फत रायगड किल्ल्यावर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. मुंबई विद्यापीठातर्फे पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर गड किल्ले स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. शिवस्मारक उत्सव समिती किल्ले रायगड आणि जिल्हा परिषद रायगड यांच्या निमंत्रणाच्या अनुषंगाने या स्वच्छता मोहिमेअंतर्गत किल्ले रायगड आणि परिसरातील प्लास्टीक्स संकलन आणि कचरा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयातील ५०० हून अधिक विद्यार्थी, विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे कार्यक्रम अधिकारी हे या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेल्या किल्ले रायगड स्वच्छ मोहिमेत प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे समन्वयक सुशील शिंदे आणि सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांच्यासह विविध प्राधिकरणाचे सदस्य सहभागी झाले

होते. जिल्हा परिषद रायगड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या सहकार्यातून व मुंबई विद्यापीठाचे अधिकारी आणि गटविकास अधिकारी जिल्हा परिषद रायगड यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत आणि देखरेखीखाली श्रमदान आणि स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

- ग्रामीण, दूर्गम आणि आदिवासी बहुल भागात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दल जागरुकता वाढविण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अपेक्षित उच्च शिक्षणातील परिवर्तनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी मुंबई विद्यापीठ पुढे सरसावले आहे. आदिवासी बहुल भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रश्न, आव्हाने, मर्यादीत संसाधने, उपलब्ध दळणवळणाची साधने आणि कमी सकल नोंदणीचे प्रमाण अशा विविध अनुषंगिक बाबींवर मात करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नुकतेच विद्यापीठामार्फत पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागातल्या जव्हार येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला पालघर जिल्ह्यातील सुमारे विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थाप्रमुख, शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी, एनजीओ, औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर आणि स्थानिकांचा या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या कार्यशाळेला प्र- कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रा. कविता लघाटे, सहाय्यक अधिष्ठाता डॉ. रविकांत सांगुर्डे, इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. शिवाजी सरगर यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले.
- आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठात योग दिन साजरा करण्यात आला. मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी सुशील शिंदे, कैवल्यधामचे विश्वस्त सदस्य नीतिन ठक्कर आणि योग गुरू शिल्पा घोणे आदी उपस्थित होते. मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि कैवल्यधाम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या योग दिनासाठी १३० महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. कॉमन योगा प्रोटोकॉल अंतर्गत प्रशिक्षित शिक्षकांकडून उर्ध्वपादासन, चक्रासन, पूर्ण पादासन, सूर्यनमस्कार, धनुरासन आणि भ्रामरी यांसह प्राणायमांचे विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यावेळी कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्यासह कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी सुशील शिंदे यांनी स्वतः योगाभ्यास केली.
- मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रथम वर्षाचे अभ्यासक्रमांचे प्रवेश दि. २६ जून, २०२४ पासून सुरु करण्यात आले आहेत.
- मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या आणखी ६ स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (Empowered Autonomous College) दर्जा देण्यात आला आहे. नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेच्या शिफारशीवरून व्यवस्थापन परिषदेने ६ स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला आहे. ही संख्या आता १८ वर गेली असून

यापूर्वी १२ स्वायत्त महाविद्यालयांना हा दर्जा देण्यात आला होता. राज्यात सर्वाधिक अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालये ही मुंबई विद्यापीठाशी संलग्नित आहेत. अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळालेल्या महाविद्यालयांना विद्यापीठ व महाविद्यालयाची एकत्रित/सह (Joint Degree) पदवी प्रदान करता येईल. या पदवी प्रमाण पत्रावर विद्यापीठ आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचे नाव आणि लोगो असणार आहे.

- मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात कार्बन न्यूट्रल ग्रीन कॅम्पस अंतर्गत विद्यापीठाने अनेक अभिनव प्रयोग राबवायला सुरुवात केली आहे. २४३ एकरात वसलेल्या या बहारदार परिसरात पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात करण्यासाठी जागतिक पर्यावरण दिन सप्ताहाच्या निमित्ताने विद्यानगरी संकुलात २०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. वृक्षारोपण मोहिमे अंतर्गत विद्यानगरी परिसरातील भाषा भवन इमारत, गांडूळ खत प्रकल्प आणि कुलगुरू निवासस्थान शेजारील आमराई येथे वड, लिंब, औदुंबर, कदम्ब आणि आंबा या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी तहसिलदार आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक बीकेसी पोलिस स्थानक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.
- विद्यापीठ अनुदान आयोग आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात स्थापित असलेल्या पश्चिम विभागीय उपकरण केंद्रात (वेस्टर्न रीजनल इन्स्ट्रुमेंटेशन सेंटर (WRIC) आता विद्यार्थ्यांना कार्यांतर्गत प्रशिक्षण (ऑन जॉब ट्रेनिंग) घेता येणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांना या केंद्रात अनुभवाधारीत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिकतानाच विद्यार्थ्यांना विषयाचे प्रात्यक्षिक ज्ञान, कौशल्ये आणि उद्योन्मुख क्षेत्रातील गरजा व संधी नुसार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पश्चिम विभागीय केंद्र आणि मुंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ही संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या राष्ट्रीय सुविधा केंद्राला शिक्षक आणि प्रयोगशाळेसंबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा मोठा अनुभव असून आता या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे.
- मुंबई विद्यापीठात विविध १५२ अनुदानित शिक्षकीय पदावर भरतीसाठी जाहिरात प्रसिद्धी करण्यात आली आहे. यामध्ये विविध विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदांसाठी ४ जागा, प्राध्यापक पदांसाठी २१ जागा, सहयोगी प्राध्यापक/ उप ग्रंथपाल पदांसाठी ५४ जागा आणि सहाय्यक प्राध्यापक/ सहाय्यक ग्रंथपाल पदांसाठी ७३ पदांचा समावेश असून ही सर्व पदे अनुदानित तत्वावर भरण्यात येणार आहेत.
- मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या(सीडीओई) संचालकपदी इंग्रजी विभागातील प्रा. शिवाजी सरगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा. शिवाजी सरगर यांनी दिनांक १२ जुलै २०२४ रोजी मावळते प्रभारी संचालक प्रा. संतोष राठोड यांच्याकडून संचालक पदाचा पदभार स्वीकारला.
- मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत (सीडीओई) चालविण्यात येत असलेल्या एमएमएस (मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्) आणि एमसीए (मास्टर ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन) या दोन

वर्षीय अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षेच्या अर्जाला सुरुवात झाली आहे. १७ जुलै ते २४ जुलै २०२४ पर्यंत विद्यार्थ्यांना या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करता येणार असून ११ ऑगस्ट २०२४ रोजी ही प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम युजीसी आणि एआयसीटी मान्यताप्राप्त आहेत. दोन्ही अभ्यासक्रमांच्या पात्रता, शुल्क, प्रवेश परीक्षेसंबंधातील अधिक तपशील मुंबई विद्यापीठाच्या सीडीओईच्या या संकेतस्थळावरून सादर करता येईल.

**स्वागत आणि अभिनंदन** :

नविन वित्त व लेखा अधिकारी प्रा. (सी.ए.) डॉ. हर्षल सुभाष वाघ यांचे स्वागत मा. कुलगुरूंनी पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन केले.

**बाब क्रमांक** : **१** दिनांक २३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त संमत करणे.

पृष्ठ क्रमांक ३७ मध्ये बाब क्रमांक ३ सुरू होण्या आधी खालील प्रमाणे दुरुस्ती सुचविण्यात आली आहे.

**"डॉ. जगन्नाथ खेमनर यांनी मेजर आणि मायनर विषयासंबंधी निकष काय असावे आणि त्या अनुषंगाने विद्यापीठ काही मार्गदर्शन करणार आहे का, याबाबत विचारणा केली."**

मा. कुलगुरूनी सभागृहास विंनती केली कि प्रथम बाब क्र. १ मंजूर करावे. त्या प्रमाणे सभागृहातील सदस्यांनी बाब क्र. १ एकमताने मंजूर केली. कुलसचिव प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांनी बाब क्र. १ मंजूर करण्यात आले, असे जाहीर केले.

**ठराव :** दिनांक २३ मार्च, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक अधिसभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**Point of Order**

डॉ चंद्रशेखर कुलकर्णी यांनी पान क्रमांक ४७ वर डॉ सखाराम डाखोरे यांचा प्रश्न क्रमांक एकचे उत्तर एकरूप परिनियम क्रमांक ४ -६ (११) (त्र) नुसार नाकारण्यात आला आहे. तसेच पृष्ठ क्रमांक ५५ वर डॉ सत्यवान हाणेगावे यांच्या प्रश्न क्रमांक ३ तीनचे हि उत्तर एकरूप परिनियम क्रमांक ४ -६ (११) (त्र) नुसार नाकारण्यात आला आहे. परंतु महाविद्यालय संलग्नता विभागाने सीडीसी बाबत सर्व महाविद्यालयांना परिपत्रक निर्गमित केलेले आहे. त्यामुळे या विभागाकडे माहिती उपलब्ध नाही, असे होणार नाही. माहिती असूनही अधिसभा सदस्यांना माहिती उप्लब्ध करून न देणे हे चुकीचे आहे. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्याचप्रमाणे "कमवा आणि शिका" योजनेची माहिती मिळालेली नाही, याबाबत सभागृहास अवगत केले. पॉईंट ऑफ ऑर्डरला अनुसरुन डॉ विजय पवार यांनी देखील त्यांच्या तीन पैकी दोन प्रश्न नाकारल्याबाबत नाराजी व्यक्त केली.

बाब क्रमांक : २ प्रश्नोत्तराचा तास

दिनांक २० जुलै,२०२४ रोजी होणाऱ्या अधिसभेसाठी ज्या सन्मानीय सदस्यांनी प्रश्न पाठविले होते, त्यासर्व सन्मानीय सदस्यांना प्रश्नाची पूरक उत्तरे पाठविण्यात आली आहेत. असे मा. कुलसचिवांनी नमूद केले.

**डॉ. दिपक प्रल्हाद रावेरकर (प्रश्न क्रमांक - १) : महाराष्ट्र शासनाच्या विविध धोरणानुसार वृक्ष संवर्धनासाठी मुंबई विद्यापीठाने काय उपक्रम केले याचे मा. कुलगुरू महोदयांनी विवेचन करावे.**

**प्र-कुलगुरूंनी** पुढील प्रमाणे उत्तर दिले की वृक्षारोपणासाठी मुंबई विद्यापीठाने एक उपक्रम हाती घेतला आहे, त्यामध्ये मुंबई विद्यापीठाचे सर्व कॅम्पस मध्ये साधारणपणे 700 पेक्षा जास्त वृक्षांची लागवड केली आहे. मुंबई विद्यापीठांमध्ये एकूण 5327 वृक्ष आहेत. आणि यांचं नीट संवर्धन व्हावं म्हणून मुंबई विद्यापीठाने वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहेत. फोर्ट कॅम्पस हा आपला हेरिटेज कॅम्पस आहे, फोर्ट कॅम्पस मध्ये पण वेगवेगळ्या जागा शोधून तिथे वृक्ष लावण्यात आलेले आहेत. जे वृक्ष लावले आहेत, ते वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. त्याच्यात बांबू, कडुनिंब,ताम्हण, बेहडा,कदंब ,औदुंबर, पिंपळ,आंबा अशा वेगवेगळ्या प्रकारचे वृक्षांची लागवड केलेली आहे. मुंबई विद्यापीठांमध्ये कार्बन न्यूट्रल कॅम्पस होण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत. त्यात मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राध्यापकांची तसेच विद्यार्थ्यांची टीम तयार केली आणि त्या टीमच्या द्वारे आपण त्याच्यात काम करतो इथे या सभागृहातील दोन सन्माननीय सदस्य प्राध्यापक विश्वबर जाधव, श्री.सुशील जाजू आणि श्री. किरण लेले हे यामध्ये सक्रियपणे काम करत आहे. प्र-कुलगुरूंनी मा. कुलगुरू महोदयांना विंनती केली कि त्यांनी यामध्ये याबाबत अधिक माहिती द्यावी.

**मा. कुलगुरूंनी** उत्तर देताना माहिती दिली कि वृक्षारोपण करण्यामागे वैज्ञानिक पद्धती आहे. आपल्या विद्यापीठाच्या भौगोलिक भागा प्रमाणे म्हणजे मिठी नदीची जी फ्लड झोन आहे. त्या फ्लड झोन नुसार तेथील रचना करणे अपेक्षित आहे. गाव म्हणून प्रोटेक्शन भेटल्यामुळे होतं त्यामुळे ते प्रिझर करणं महत्वाचं आहे. पहिला भाग एक कार्बन न्युट्रल कॅम्पस आणि रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया करणे. रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया करतो त्या प्रक्रियेसाठी जो जैवविविधता लागते. आपल्या विद्यापीठ परिसरात साधारणतः 137 प्रकारचे योग्य झाड आहेत. तसेच 34 फॅमिली मधल्या 64 पक्षांची वेगळे निरनिराळे प्रकार आहेत. वृक्षारोपण करण्याचा उद्देश केवळ जमिनीची धूप थांबवणं हा नाही. बऱ्याच वेळा होतं कसं की लवकर वाढणाऱ्या झाडांचे रोपन करतो, काही वेगळ्या प्रकारचे झाडे लावतो की लवकर वाढतील. परंतु वास्तविकतः तसं अपेक्षित नसतं. वड,पिंपळ, आंबा,आवळा इत्यादि संबंधित महत्व समजवून सांगितले. जेव्हा आपण कार्बन न्युट्रल कॅम्पस म्हणतो तेव्हा त्याचं कार्बन कॅल्क्युलेशन्स केले जाते. एक झाड साधारणतः त्याच्या दहा वर्षाच्या आयुष्यामध्ये 0.3 ton एवढं कार्बन Sequester जर वृक्षाची लागवड जर मोठ्या प्रमाणावर केली तर कार्बन sequesteration होण्याचे प्रमाण वाढेल. मुंबई विद्यापीठाचा परिसर हा दक्षिण मुंबई भाग आहे, तो केव्हाही submergence येऊ शकतो, म्हणून त्या दृष्टीने सुद्धा काही उपाय योजना करत आहोत. तसेच पाण्याचं पुनर्वापर करणे त्या दृष्टीने वेस्ट वॉटर हार्वेस्टिंग, वेस्ट वॉटर ट्रीटमेंट सिस्टीम करत आहोत. रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे व सोलरचे system

आपण ठाणे उपपरिसरात आणत आहोत. त्याच्यामुळे आपल्याला ॲडिशनल एनर्जी मिळेल. सोलर सिस्टम पुढे भविष्यात कालिना कॅम्पस मध्ये हि आणू. आपण त्या दृष्टीने काम करत आहोत आणि एकंदरीत सर्व कॅम्पसचा विचार करत आहोत.

**डॉ. दिपक प्रल्हाद रावेरकर (प्रश्न क्रमांक - २)**

**मुंबई विद्यापीठाच्या डी.एल.एल.इ विभागात काय काय उपक्रम चालत असतात आणि नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत संबंधित विभागाचा काय सहभाग होता ? या संबंधी सविस्तर माहिती मा. कुलगुरू महोदयांनी दयावी हि विंनती.**

प्रा. डॉ. बळीराम गायकवाड (संचालक,DLLE) यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले.आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मुंबई विद्यापीठाचा DLLE विभाग म्हणून ओळखला जातो. हा विभाग दिनांक १२ ऑक्टोबर १९७८ रोजी स्थापन झालेला आहे. अत्यंत महत्त्वाचा असलेला हा विभाग १९९४ पासून या विभागाला आपण अध्यापन विभाग म्हणून ओळखतो. या विभागात १९९४ च्या आधी फक्त ॲक्टिव्हिटी चालत होती. आणि १९९४ पासून मात्र एक अकॅडमिक डिपार्टमेंट मधून पुढे आला आहे. आणि मुंबई विद्यापीठातील अनेक विभागांपैकी महत्त्वाचा विभाग म्हणून कौशल्य विकास कार्यक्रम त्याचबरोबर कुशल सुजाण नागरिक निर्मितीसाठी आणि अनेक उपक्रम या विभागामार्फत राबवले जातात. या विभागाचे प्रमुख ध्येय जे आहे, अर्थपूर्ण आणि शाश्वत संबंध वाढवणे म्हणजे सामाजिक बदलासाठी अनेक प्रकारचे विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे. साधारणतः जी काही उद्दिष्ट आहेत ती विद्यार्थ्यांमध्ये समाजातील जबाबदारीची भावना निर्माण करणे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील आव्हानांचा क्षमतेने सामना करण्यासाठी पाठबळ मिळेल, अशा कार्यक्रमांची रचना करणे. दिनांक १८ जुलैला मुंबई विद्यापीठाचा १६८ वा वर्धापन दिना निमित्त आपण कार्यक्रम घेतला, तेव्हा त्यामध्ये आपले प्रमुख पाहुणे होते, श्री विवेक फनसळकर सर, त्यांनी सुद्धा हेच सांगितलं की विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास होण्याच्या अनुषंगाने आपण ठोस पावलं उचलली पाहिजेत. आणि त्यांनी काही सूचनाही केल्या होत्या त्यातल्या बऱ्याचशा गोष्टी आपण DLLE विभागाच्या माध्यमातून उपक्रम करत आहोत. शिक्षण आणि प्रत्यक्ष जीवन अनुभव या दोन्हीमध्ये खूप अंतर राहते, त्याच गोष्टीचे उत्तर म्हणून आपल्याला या विभागाकडे पाहता येईल यामध्ये विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष जीवनातील आव्हान आणि त्यांच्या क्षमता या दोन्ही गोष्टींची सांगड घालून आपण कार्यक्रमांचा आयोजन करतो. ज्याच्या माध्यमातून अकॅडमिक्स आणि प्रॅक्टिकल लाईफ या दोन्ही मधला गॅप आपल्याला कमी करून घेता येईल. त्यामध्ये वास्तविक जीवनातील परिस्थितीशी व्यापकता आणि समरसता वाढीसाठी इथे शिक्षक त्याचबरोबर विद्यार्थी या दोघांनाही ट्रेन करण्याचं काम DLLE विभागाच्या अनेक उपक्रमांतर्गत होत असतं.

या विभागाला जे काही अकॅडमीक प्लॅनिंग दिलेलं असतं त्या प्लॅनिंग मध्ये आपल्याला केंद्राकडून सूचना येत असतात आणि त्या सूचनानुसार आपण वर्षभरात कार्यक्रमाचे आयोजन करतो आणि यावर्षी जे काही सूचना आल्या होत्या त्यानुसार कौशल्य विकास प्रशिक्षण आणि या माध्यमातून

सामाजिक बांधिलकी जपणुकीसाठी कार्यक्रमांचा आयोजन करणे अशा आपल्याला गाईडलाईन्स होत्या त्यामध्ये विद्यार्थ्यांचा रोजगार क्षमता कसा वाढेल याचा विचार केला जातो.

डीएलएलइ विभाग आणि महाविद्यालयांच्या सहकार्याने समाजामध्ये आपण शैक्षणिक आणि तांत्रिक संसाधन प्रदान करणे या अनुषंगाने अनेक कार्यक्रम केलेले आहेत. आपल्या मुंबई विद्यापीठाच्या या विभागामध्ये प्रामुख्याने अकॅडमिक डिपार्टमेंट म्हणून दोन प्रोग्राम आपण राबवतो त्यामध्ये ग्रामीण विकास या विषयांमध्ये एम.ए. आणि ग्रामीण विकास याच विषयांमध्ये आपण पी.एचडी. पदवीसुद्धा आपल्या विभागाकडून प्रदान केली जाते. ग्रामीण विकास या विषयामध्ये थोडक्यात माहिती देण्याचा मी प्रयत्न करेन. मुंबई आणि ठाणे या दोन शहराकडे आपण महानगर म्हणून पाहतो. आणि आधुनिक संस्कृती घेऊन पुढे जात असतो परंतु असं जरी असलं तरी आपण पाहतो की महाराष्ट्रा मध्ये सर्वात जास्त अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण सगळ्यात जास्त ठाणे जिल्ह्यामध्ये आहे. ही परिस्थिती आपण विसरू शकत नाही. यांना सुद्धा सोबत घेऊन जाण्यासाठी ग्रामीण विकास या विषयांमधून आपण सर्वात मोठा अकॅडमिक प्रोग्राम राबवत असतो. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सर्व भागातील विद्यार्थ्यांना या ग्रामीण विकास विषयांमध्ये आणि त्याचबरोबर पी.एचडीच्या विषयामध्ये सुद्धा आपण ॲडमिशन देणे आणि त्या विभागांमध्ये अनेक कार्यक्रमांचे आयोजन करणे. अशा प्रकारचा अकॅडमिक प्लस प्रॅक्टिकल अशा दोन्ही गोष्टी या विभागामार्फत केल्या जातात. हे करत असताना विविध तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे. संशोधन, प्रकाशने, मौखिक चाचणी, परिसंवाद, विशेष सादरीकरण, क्षेत्र भेटी या सगळ्या गोष्टी आपण करत असतो. इंटर्नशिप आणि आंतरवासिता यांची सुविधा सुद्धा आमच्या विभागामार्फत करून देण्यात येते. क्षेत्रभेटीचे आयोजन सुद्धा आपण करतो आणि हे करत असताना क्लासरूम आणि सोसायटी आणि समाजामधील असलेल्या वेगवेगळ्या संस्था यांच्यासोबत जोडण्याचा एक, महत्त्वाचा उपक्रम विभागाच्या मार्फत आपण करत असतो. यामध्ये ग्रामीण विकास संबंधित कामाचा जसे की फळ उत्पादन, फळ प्रक्रिया, ग्रामीण वित्त प्रणाली, तांदूळ संशोधन केंद्र, खार जमीन संशोधन, एपीएमसी बाजार प्रक्रिया, या संस्था मध्ये आपण विद्यार्थ्यांना तिथे नेऊन ट्रेनिंग देतो. माहिती देतो आणि यामध्ये अनेक संस्थांचा आपल्याला योगदान आणि सहकार्य मिळत असतं त्यामधल्या मुख्य जी संस्था आहे. त्याच्यामध्ये आहे कृषी विज्ञान केंद्र जव्हार, त्याच्यानंतर युसुफ मेहर अली ग्रामविकास केंद्र पनवेल, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, मणी भवन गांधी संग्रहालय मुंबई, खार जमीन संशोधन केंद्र पनवेल, आपणा बाजार सहकारी संस्था, त्याचबरोबर एपीएमसी बाजारगृह वाशी, नवी मुंबई ग्रामीण विकास महाविद्यालय व संस्था ग्रामीण विभाग डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, तांदूळ संशोधन केंद्र कर्जत, निसर्ग निर्माण शेती उत्पादन केंद्र मुंबई, अक्षरा शेती उत्पादन संस्था, माण देशी फाउंडेशन बाय फाउंडेशन सोबत आपलं टायप आहे आणि त्यांच्यासोबत आपल्या विद्यार्थ्यांना तिथे नेऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव देतो. ग्रामीण जीवन आणि ग्रामीण विकास या अनुषंगाने आपण प्रॅक्टिकल ट्रेनिंग सुद्धा देत असतो. तर सहामाही पीएचडी संशोधन अहवाल हा जेव्हा विद्यार्थी प्रेझेंट करतात. त्यामध्ये आम्ही विद्यार्थ्यांना या सहा महिन्यांमध्ये त्यांनी कुठ कुठल्या संस्थांना भेटी दिल्यात त्याचा सुद्धा प्रात्यक्षिक आपण विभागामध्ये एक्सपर्टच्या समोर घेत असतो. मुंबई विद्यापीठाचे जे एनएसएस डिपार्टमेंट आहे, एनसीसी आहे, तसेच हा विभाग

सुद्धा त्याचप्रमाणे कार्य करत असतो. आणि या तिन्ही विभागांमध्ये जेव्हा विद्यार्थी १२० तासाचा अतिरिक्त कार्यभार किंवा अतिरिक्त कार्य करत असतात त्या त्या तासांना आपण सामाजिक शैक्षणिक कार्य म्हणतो.

विद्यार्थाना या विषयासाठी सामाजिक शैक्षणिक असे कार्य (१२० तासांचे) पूर्ण करायचं असते. हे केल्यानंतर त्यांना साधारण १० गुण मिळत असतात. एनएसएस आणि एनसीसीप्रमाणेच हे गुण असतात. सध्याच्या आपल्या प्रक्रियेमध्ये एखादा विद्यार्थी एनसीसी घेऊ शकतो किंवा DLLE घेऊ शकतो, या तिन्ही पैकी त्यांनी एक निवडायचे आणि ते निवडल्यानंतर १२० तास पूर्ण केल्यानंतर त्यांना १० गुण प्रदान करतो. एक महत्त्वाची गोष्ट याच्यामध्ये की ह्या विस्तार कार्य प्रकल्पांचे मूल्यमापन करून विद्यापीठ अध्यादेश २२९ (अ) अंतर्गत आपण त्यांना ते मार्क्स देतो. त्यासाठी त्यांना करिअर प्रकल्प, उद्योग अभिमुख प्रकल्प, अन्नपूर्णा योजना प्रकल्प, कौशल्य विकास हे त्यांना आपण टॉपिक दिलेले आहेत. त्यानुसार ते सादरीकरण करत असतात. त्यानंतर काही ग्रुप सादरीकरण सुद्धा करत असतात. त्या ग्रुप सादरीकरणाच्या माध्यमातून विशेषतः लोकसंख्या शिक्षण, क्लब सर्वेक्षण संशोधन, सर्वांसाठी शिक्षण सुविधा, पर्यावरण शिक्षण, नागरी संवेदना, शिस्त, ग्राहक मार्गदर्शनाशी समाजाशी निगडित असले मुद्दे हे ग्रुप प्रेसेंटेशन मध्ये देतो. म्हणजे समाजाचा कुठलाही अंग विद्यार्थ्यांना त्यांच्या अकॅडमिक्स मधून आणि सामाजिक जीवनामधून विभक्त राहणार नाही. याची खातर जमा पण यामधून करत असतो. डीएलएलइ विभागांमध्ये सध्या ३६,३७१ विद्यार्थी यामध्ये समाविष्ट आहेत. आणि ३६१ महाविद्यालयांमध्ये हे पदवी महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना एक आदर्श नागरिक म्हणून आणि मानवी कर्तव्य पटवून देण्याच्या अनुषंगाने विभाग अत्यंत हिरीरीने कार्यरत असतो. विद्यार्थ्यांचे रोजगार क्षमता आणि तंत्रज्ञान क्षमता वाढवण्यासाठी हे सर्व त्याला सप्लीमेंट्री प्रोग्राम आपण घेत असतो. आता एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचे समायोजन करणे त्यांच्या रेकॉर्ड ठेवणे, नोंदी ठेवणे आणि त्या नोंदी कधीही जेव्हा पाहिजे तेव्हा विद्यापीठाला खास करून परीक्षा विभागाला ते उपलब्ध असणे ही एक मोठी जिकीरीची आणि मोठी लांबलचक अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत विशेषतः लांबून जे काही महाविद्यालये येतात त्यांचे प्रतिनिधी येतात. त्यांनी इथे यायचं असतं त्या नोंद वह्या सादर करायच्या असतात. डायरी चेकिंग झाल्यानंतर त्याची नोंद आमच्या विभागांमध्ये होते आणि नंतर त्यांना ते सर्टिफिकेट दिलं जातं. ही सर्व प्रोसेस वेळ खाऊ आहे आणि खूप दुरून प्रवास करून हे विविध महाविद्यालयाचे प्रतिनिधी येत असतात. तर या सर्व प्रक्रियेत मध्ये त्यांचा वेळ जाऊ नये. आपल्या सर्वांचा वेळ वाचावा, रेकॉर्ड सुद्धा व्यवस्थित पद्धतीने उपलब्ध असावे यासाठी मुंबई विद्यापीठाने गेल्या तीन वर्षापासून 'ऑनलाईन डॉक्युमेंट सबमिशन पोर्टल' तयार केलेला आहे आणि या ऑनलाइन डॉक्युमेंट सबमिशन पोर्टल ज्याला आपण 'दस्तावेज सादरीकरण पोर्टल' असं म्हटलेलं आहे. या पोर्टलच्या माध्यमातून सर्व रेकॉर्ड आपण व्यवस्थित पद्धतीने जतन करतो. महाविद्यालयांचे विस्तार कार्य या उपक्रमांचा अहवाल ऑनलाईन दाखल करण्याची आपण सर्वांना सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. ऑनलाइन डॉक्युमेंट सबमिशन पोर्टलमध्ये लांबून येणारे सर्व महाविद्यालय आपला रेकॉर्ड अपलोड करू शकतात. त्याचबरोबर कागदपत्राची डिजिटल छाननी सुद्धा आम्ही ऑनलाईन उपलब्ध करून देतो. सर्व कार्याचा अहवाल ध्वनी चित्रफीत सुद्धा त्याच्यामध्ये देऊ शकतात.

छोटे छोटे व्हिडिओ अपलोड करू शकतात. या सर्व सुविधा DLLE विभागाकडून करून देण्यात आलेले आहे. त्यांच्या दहा मार्कांचा allotment हे सुद्धा आम्ही त्यांना ऑनलाईन पद्धतीने देऊ शकतो. त्याचबरोबर ३६००० सध्या विद्यार्थी आहेत आणि ७७५० शिक्षक हे सध्या या कार्यपुर्तीच्या सर्व प्रमाणपत्राच्या प्रोसेस मध्ये सहभागी आहेत. सामाजिक विषयावर पथनाट्य करणे. भिंतीचित्र प्रदर्शन प्रबोधन गीते, वक्तृत्व, पोवाडा सर्वेक्षण, परिसंवाद परिषदा अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही सामाजिक जाणीव आणि सामाजिक यावर काम करतो आणि त्यांना एक सुजाण नागरिक घडवण्याच्या दृष्टिकोनातून आपण प्रयत्न करतो.

विद्यार्थ्यांनां कौशल्य विकास उद्योजक उद्योग अभिमुखता, करिअर मार्गदर्शन, माहिती तंत्रज्ञान, उद्योजकता विकास, समाजातील महिलांची स्थिती या सर्व गोष्टीसुद्धा विभागाच्या माध्यमातुन देत असतो. पर्यावरण पूरक धोरण राबवणे आणि विद्यार्थ्यांना सुद्धा पर्यावरण पूरक त्यांच्यावर संस्कार होणे या दृष्टिकोनातून सुद्धा या विभागामध्ये अनेक वैविध्यपूर्ण उपक्रम केले जातात. प्रदूषण, एड्स, ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरण समस्या, निरक्षरता, बालकामगार, हुंडा बळी निर्मूलन, कुपोषण यासारख्या गोष्टी सुद्धा आपण वर्षभर करत असतो. हे करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचा आवाका इतका प्रचंड आहे कि सहा जिल्ह्यांमध्ये एखादा कार्यक्रम करण्याची जेव्हा गरज पडते. तेव्हा आम्हाला सर्वांशी एकाच वेळी कम्युनिकेट करणं हे सुलभ व्हावे, या दृष्टिकोनातून विभागवार कार्यशाळा घेतो. यावर्षी आम्ही १८ वेगवेगळे विभागीय स्तरावरचे कार्यशाळा घेतल्या आणि त्या सर्व कार्यशाळांमध्ये आम्ही जे क्षेत्र संचालक आहेत त्या सर्वांना कशा पद्धतीने आपले कार्यक्रम होणार आहेत याची त्यांना माहिती दिली. याच्यामध्ये विद्यार्थी सुद्धा समाविष्ट होतात. तशाच पद्धतीने द्वितीय सत्रामध्ये सुद्धा असे प्रशिक्षण कार्यक्रम चालत असतात आणि मुंबई विद्यापीठाच्या DLLE विभागाची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणून आपल्याला पाहायचं असेल किंवा त्याचा निर्देश करायचा असेल तर ते म्हणजे उडान हा मुंबई विद्यापीठाचा अतिशय नामवंत अशा प्रकारचा कार्यक्रम आहे. या उडान कार्यक्रमांमध्ये सर्व कार्यक्रम हा विद्यार्थी करत असतात. या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन हे विद्यार्थी करत असतात ही एक त्याची अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. यावर्षी १८ परिसंवाद कार्यशाळा घेतलेले आहेत. वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये आणि जेणेकरून सर्व ३६० महाविद्यालयात यामध्ये सहभागी झाली. 'उडान' महोत्सवांमध्ये संपूर्ण सहा जिल्ह्यांमध्ये मिळून मुंबई विद्यापीठाचे सर्व सलग्नित महाविद्यालय, यातील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आधुनिक तंत्रज्ञान युगात व्यवस्थापन शिक्षण आणि उद्योजकता या क्षेत्रातील सर्व स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. ज्यामध्ये पथनाट्य सादरीकरण, पोवाडा गायन, सर्जनशील लेखन, वक्तृत्व स्पर्धा, भिंती चित्र रेखाटन, अधिक गोष्टी यामध्येसमाविष्ट होत्या आणि उडान करंडक देऊन जे काही विजयी उमेदवार होते, त्यांना गौरव करण्यात आला. त्यामध्ये प्रमुख पाहुणे याचबरोबर जिल्हा क्षेत्र समन्वयक सुद्धा उत्साहाने काम करत असतात. आयोजन आणि सूत्रसंचालक हे विद्यार्थीच असतात.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व प्रकारचे उपक्रम करत असतो. विस्तार कार्याची वार्षिक पर्यवेक्षण व मूल्यमापन सत्र हे १२० तासाचे आहे. दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सीडीओई) हे सुद्धा मार्गदर्शन केंद्र मदत करत असतात. त्यांच्या माध्यमातून समाजशास्त्र, इतिहास

आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची मराठी, अर्थशास्त्र या विषयाची नियमित व्याख्याने सुद्धा आमच्या ऑनलाईन मार्गदर्शन केंद्रामधून होत असतात. DLLE चे मुख्य कार्यालय चर्चगेटला आहे. येथे स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजन हे सुद्धा आपण करत असतो. ज्यामध्ये दरवर्षी आजीवन अध्ययन व विस्तार मार्ग विस्तार कार्य, ग्रामीण विकास निरंतर शिक्षण, प्रौढ शिक्षण या विषयावर स्थानिक आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन सुद्धा करण्याचं काम वर्षभर करत असतात. निरंतर शिक्षणाची संधी दहावी व बारावीनंतर पुढे काय करायचं आज हा जो जटील प्रश्न समाजामध्ये आहे त्या अनुषंगाने सुद्धा आपलं विभाग कार्य करण्याचा प्रयत्न करतो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रणालीमध्ये विभागाने मोठे योगदान देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्यामध्ये ओपन इलेक्टिव्हस मध्ये वर्टीकल वन मध्ये एक अभ्यासक्रम आलेला आहे. ओपन मध्ये आणि त्याचबरोबर वर्टीकल चार मध्ये सुद्धा ग्रामीण अभ्यास आणि लोकसंख्या शिक्षण, मतदार साक्षरता, इलेक्ट्रिक समुदाय प्रतिबद्धता, कम्युनिटी एंगेजमेंट यामध्ये सुद्धा दोन श्रेयंकाचे सिलॅबस आम्ही दिलेले आहेत. आणि ते मंजूर झालेले आहेत. यावर्षी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अनुलोम सिक्स वर्टीकल सहा या गटांमध्ये विभागाने प्रथम व द्वितीय सत्रासाठी प्रत्येकी दोन श्रेयांकाचे विस्तार कार्य एक्सटेन्शनवर अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेला आहे आणि विभागाने यावर्षीच्या लोकसभा निवडणूका कार्यकाळात सुद्धा त्या अनुषंगाने काम केले आहे. केंद्राकडून आलेला जो काही प्रोग्राम होता किंवा जे निर्देश होते त्यानुसार यावर्षी DLLE विभागाने निवडणूक साक्षरता व जनजागृती मोहिमेमध्ये आपल्या निवडणूक आयोगाच्या समवेत त्यांच्या सोबत राहून गेली सहा महिने सातत्याने जानेवारी ते इलेक्शन पार पडेपर्यंत या संपूर्ण कालावधीमध्ये DLLE विभागाचे सर्व जे विभाग आहेत वेगवेगळ्या महाविद्यालयामध्ये त्या सर्वांनी याच्यामध्ये सातत्याने भाग घेतलाय आहे. त्यामध्ये निवडणूक साक्षरता या अनुषंगाने आपण मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सर्व ठिकाणी कार्यशाळा घेतल्या होत्या. विविध महाविद्यालय त्यामध्ये समाविष्ट होती आणि त्याचबरोबर मतदार शिक्षण व निवडणूक साक्षरता यासंदर्भात अभ्यासक्रम सुद्धा आपण बनवलेला आहे आणि तो अभ्यासक्रम मंजूर सुद्धा झालेला आहे. यामध्ये विशेषतः यावर्षी इलेक्शन जेव्हा झाले त्या निवडणुकीमध्ये नव मतदार नोंदणी हा एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा घेऊन निवडणूक आयोग काम करत होतं आणि फक्त विद्यापीठ आणि शाळाच नव्हत्या तर सरकारी देखील यंत्रणा होत्या, जी काही विभाग होते. ते सर्व विभाग यामध्ये काम करत होते. त्यांच्या बरोबरीने मुंबई विद्यापीठ आणि DLLE विभाग पात्र विद्यार्थी जे १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत, त्यांचा डेटा या युनिफाईड डिस्टिक इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून कोणत्या विद्यार्थ्यांना अठरा वर्ष पूर्ण झालेला आहे, परंतु त्यांचे मतदार नोंदणी झालेली नाही. हे शोधणे, व त्या विद्यार्थ्यां पर्यंत पोहोचणे आणि त्यांची नोंदणी करणे. तसेच, मतदान करणं किती आवश्यक आहे, यासंदर्भातील त्यांना संवेदनशील बनवणं यासाठी सुद्धा, अनेक उपक्रम केलेले आहेत. इलेक्ट्रोवेल लिटरसी क्लब एनएसएस आणि DLLE विभागाने एकत्रितपणे इलेक्टोरल लिटरसी क्लब प्रत्येक महाविद्यालयामध्ये स्थापन होण्याच्या अनुषंगाने सुद्धा आपण काम केलेलं आहे आणि ज्यामध्ये मी मतदान करणार अशा प्रकारची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. ईव्हीएम व्हीव्हीपॅटचे प्रात्यक्षिक सुद्धा आपण दाखवलेली आहे त्याचबरोबर मॉक

मतदानांचे आयोजन सुद्धा आपण अनेक महाविद्यालयांमध्ये केलेला आहे. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आपण सर्व मुंबई विद्यापीठाच्या सर्व विभागांमध्ये सर्व महाविद्यालयांमध्ये आपण अनेक प्रकारचे प्रोग्राम त्या अनुषंगाने राबवले होते. कार्यशाळा घेतल्या प्रशिक्षण सत्र आयोजित केल्या. अशा प्रकारे विविध कार्यक्रम आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने यावर्षी राबविलेला आहे.

**डॉ चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी याबाबत उप प्रश्न विचारला की या विनानुदानित पदांसाठी विद्यापीठ काही करणार आहे का?

**मा कुलगुरूनी** याबाबत उत्तर देताना सभागृहास माहिती दिली की डायरेक्टर लाईफ लॉन्ग लर्निंग हे पद शिक्षकीय पद आहे. स्वतः डॉक्टर बळीराम गायकवाड हे त्या विभागाचे संचालक आहेत. त्यावेळेच्या यूजीसीच्या प्लॅन्ड पोस्ट मधून आलेले आलेले आहेत. त्याप्रमाणे ती पोस्ट विद्यापीठाने घेतलेली आहे. सगळ्याच विद्यपीठांना प्लॅन्ड पोस्ट मिळाल्या नंतरच्या काळात प्लॅनिंग कमिशनने पोस्ट देण्याची प्रथा नंतर बंद झाली पण आपल्याकडे प्लॅनमधून ज्या काही पोस्ट आल्या त्यांन आपण घेतल्या आहेत.

**डॉ. दिपक प्रल्हाद रावेरकर (प्रश्न क्रमांक - ३) विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने या वर्षी सर्व निकाल वेळेवर लावले. What were the gaps identified and technologies deployed for the timely declaration of result?**

**डॉ. पूजा रौंदळे** (संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ) यांनी प्रश्नाचे उत्तर दिले. त्यांनी माहिती दिली कि परीक्षाभवनाच काम हे जटिल प्रकारचं असतं साधारण आपण वर्षातून दोन वेळा परिक्षा घेत असतो. मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत जी महाविद्यालयांची संख्या येते ती साधारण ८७४ प्लस आहे. उन्हाळी आणि हिवाळी परीक्षा तर या दोन्हींमध्ये जे आपण परीक्षा घेतो साधारण साडेचारशे ते पाचशे परीक्षा आपण घेत असतो. २२ मार्च २०२४ ला आपली सगळयात मोठी परीक्षा सुरू झाली. पिजीच्या परीक्षा आता सुरू झालेल्या आहेत. म्हणजे २२ मार्च ते ऑगस्ट, ही फक्त उन्हाळी परीक्षा चालू आहे. साधारण लक्षात येईल की दहा ते अकरा महिने आपल्या विभागामार्फत परीक्षा सतत चालू असतात. ४५० ते ५०० अभ्यासक्रम असतात. आणि सगळ्यात मोठी परीक्षा कॉमर्स / वाणिज्य अभ्यासक्रमाची असते. आपल्या विद्यापीठाचे एक मान्यता प्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. त्या महाविद्यालयांच्या सोबत एक प्रोजेक्ट केलेला आहे. अशा सहा विद्यार्थ्यांनी एक वेब एप्लीकेशन तयार केलेला आहे. (त्याची टेक्नॉलॉजी आहे नोट्स आणि Excel तर नोट जे एस आहे. फ्रंट साठी त्यांनी नोट जे एस वापरलं आणि बॅंक साठी Excel चा वापर करण्यात आला आहे. यामध्ये त्यांनी वेगवेगळे लॉगिन दिलेले आहेत. म्हणजे परीक्षा जेव्हा आपण सुरू करतो किंवा आम्ही त्याला डिक्लेरेशन म्हणतो तर आधी डीओसी निघते (डेट ऑफ कमेन्समेंट) झाल्यानंतर त्या-त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा या जाहीर होतात. तर हे जे आम्ही डॅशबोर्ड तयार केलेला आहे. त्यामध्ये डीओसी टाकली जाते वेगवेगळ्या परीक्षांबाबत संपूर्ण माहिती टाकली जाते. परीक्षांच्या तारखा टाकल्या जातात, किती परीक्षा आहेत ते टाकले जातात, सब्जेक्ट कुठले आहेत, मुलं किती आहेत, त्याच्यामध्ये रजिस्टर आहेत, त्याचे पेपर सेटिंग केले जाते. नंतर परीक्षा झाल्यानंतर जेव्हा आमच्याकडे

पेपर येतात, तर त्या परीक्षेची किती प्रत्येक विषयाचे किती पेपर झाले, ती माहिती त्याच्यामध्ये असते. आणि मग नंतर ही सगळी माहिती एक वन क्लिक वर असते. एक ॲप बनवलेला आहे आणि त्याचे लॉगिन हे वेगवेगळ्या स्तरावरचे जे आमचे अधिकारी आहेत त्यांना त्या देतो म्हणजे अपॉइंटमेंट करणारे, त्यामध्ये अपॉइंटमेंट रिलेटेड माहिती भरता येते. रिझल्ट डिक्लेरेशन सेक्शन आहेत, कॅप सेक्शन आहे, त्यांना ती माहिती दिसते, आणि कुठले रिझल्ट लागलेत कुठल्या लागायचे राहिले, वगैरे यायचे त्याच्यामध्ये माहिती असते.

हे एप्लीकेशन नोट्स आणि ई-स्क्वेअरच्या माध्यमातून आहे. यामध्ये कुठले रिझल्ट लागले, कुठले लागायचे राहिलेत, किती दिवस राहिल्यात, रिझल्ट लागला, ही माहिती लगेचच उपलब्ध होते, आणि ते वेब बेस असल्यामुळे त्याच्यामध्ये जे डायनॅमिकली डेटा ॲड झाला तरी तो सगळ्या लॉगिन मध्ये दिसतो. त्यामुळे सर्वांना अद्यावत माहिती लगेच मिळते. प्रश्न पत्रिका ऑनलाईन पाठविणे हे आमच्या इथून Manuscript विभागातून होत असते. तर ही जी ऑनलाईन परीक्षाच्या पेपरची जी डिलिव्हरी होते. हे सुद्धा खूप क्लिष्ट काम असतं. एक स्टॅटिस्टिक्स चा भाग म्हणून कमीतकमी दिवसाला पाच प्रश्न पत्रिका तर कमाल अडीचशे प्रश्नपत्रिका एक-एका दिवशी असतात. म्हणजे २५० विषयांच्या परीक्षा एकाच दिवशी असतात आणि कॉमर्स चे आपले बरेचशे कॉलेज आहेत, त्यापैकी जवळपास अडीचशे अधिक आपले सेंटर आहेत. आणि त्या सेंटरला योग्य तो पेपर जायला हवा बरोबर त्याच विद्यार्थ्यांचा पेपर, त्याच क्वेश्चन पेपर जायला हवा यासाठी आपण एमकेसीएल म्हणून एक अजून आपल्याकडे वेंडर आहे. एमकेसीएल मध्ये आपला स्टुडन्ट चा डेटा आहे. ज्या मुलांनी परीक्षेचे फॉर्म भरलेले असतात. त्यामध्ये त्यांचा पूर्ण डेटा असतो आणि सेंटर अलॉटमेंट असते. कोणत्या सेंटरला कोणत्या मुलांना कुठला पेपर जातोय आणि आज त्या सेंटरला किती परीक्षा होणार आहे. हे सगळं त्याच्यामध्ये असतं आणि तो गतिमान पद्धतीने होण्यासाठी एक लॉगिन तयार करून घेतलेला आहे. त्याला डायनामिक डेली टेस्टिंग फीचर असं म्हणतो. ई-डिलिव्हरी साठी देखील अशीच सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रश्न पत्रिका वितरण करण्याचे काम सुरळीत झालाय. सेकंड हाफ २०२३ च्या परीक्षा झाल्या त्यामध्ये ऑनलाईन अटेंडन्स सिस्टम मुळे खूप मदत मिळाली आहे. कॉलेजेस मध्ये एक्झाम सेंटर आहेत.

पूर्वी ऑफलाइन अटेंडन्स घेतले जात होते. त्या उत्तर पत्रिकेवर वरती बबलिंग केलं जायचं, म्हणजे मुलांना जे सीट नंबर दिले जातात. परीक्षेसाठी जे आपण आपण रोल नंबर वरती परीक्षा लिहीत नसतो. वेगवेगळ्या मुलांचे वेगवेगळ्या कॉलेजेस मध्ये नंबर असतात, तर सीट नंबर हे युनिक आयडेंटिफिकेशन असतं. मुलांच्या उत्तरपत्रिकेसाठी आपण बबल्स वापर करत होतो. पूर्वीच्या ज्या परीक्षा होत होत्या त्यामध्ये जर एखाद्या विद्यार्थ्याने कोड किंवा सीट नंबर याच्यामध्ये जर चूक केली तर ते आपल्याला लक्षात येत नव्हतं आणि असे रिझल्ट जे होते ते आपल्याला राखीव ठेवावे लागत होते. त्याला आपण आर आर केसेस असं म्हणत होतो. सेकंड हाफ २०२३ मध्ये ज्या परीक्षा झाल्या तर यामध्ये आपण सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. आता विद्यार्थ्यांचे परीक्षेच्या वेळी ऑनलाईन अटेंडन्स घेतलं जाते. त्यामुळे आमच्या कॅप विभागाला ती रोजच्या रोज ऑनलाईन अटेंडन्स मिळतो. आणि कुठली मुलं परीक्षेला गैरहजर आहेत कुठली मुलं हजर आहेत याचा त्यामध्ये लगेचच आम्हाला डेटा मिळत असतो. त्यामुळे याची एक आम्हाला खूप मदत झालेली आहे. त्यामुळे आता आर आर केसेस अतिशय

कमी झाले आहेत. राखीव रिजल्ट आता आपण कुठलेही ठेवलेले नाहीयेत आणि हे खूप मोठे योगदान परीक्षा भवनाचे आहे या रिझल्ट मध्ये जो नो इन्फो डेटा त्यातून निघतो त्यामुळे जे अटेंडन्स ट्रेकिंग आहे. आपल्या सात जिल्ह्यांमध्ये परीक्षा चालत असतात, जर आपण बाकीच्या विद्यापीठाची तुलना केली तर या सात जिल्ह्यामध्ये विद्यापीठाचा विस्तार लक्षात येईल. मुंबई, मुंबई उपनगर ते रत्नागिरी, सिंधुदुर्ग, वाडा ,मिनी डिस्ट्रिक्ट इथून उत्तर पत्रिका जमा होतात, तर उत्तर पत्रिका जमा झाल्यानंतर एक गनिंग केलं जातं, कारण आपण त्याला क्यू.आर. कोड लावलेला आहे. गनिंग केल्यामुळे तो जो क्यू.आर. कोड आहे. युनिकली तो त्यामध्ये तो रीड केला जातो. ऑनलाईन अटेंड शीट असतात ते आणि हे गनिंग केलेलं याचा मॅपिंग पण केलं जात.

विद्यापीठाकडे आता दुहेरी स्वरक्षण यासाठी तयार आहेत. उत्तर पत्रिकेवरती युनिक आयडेंटिफिकेशन दोन वेळेला होतं, गनिंग मार्फत आणि ऑनलाईन अटेंडन्स या मार्फतही एक दुहेरी मॅपिंग केलं जातं. उत्तर पत्रिका आपल्याला कुठल्या सेंटरचे आलेले आहेत. किती मुलांचे आलेले आहेत. हया माहितीमुळे एक खूप चांगली मदत झालेली आहे. ओएसएम प्रणाली व्दारे वरती असेसमेंट करतो तर हे जे ओएसएम वरती असेसमेंट करतो त्याचा जो प्रोग्राम आहे तो आपल्याकडे मॅग्नेटिक मी म्हणून एक वेंडर आहे तो त्यांनी दिलेला आहे. विद्यापीठात आता ३२ पानी किंवा ३८ पानी उत्तर पत्रिका आहे. या उत्तर पत्रिकेच्या सर्व पानाच्या उजव्या बाजूस एक छोटा क्यू. आर.कोड छापलेला आहे आणि तो त्याचा पेज नंबर आहे. म्हणजे आपण आपल्याला कळण्यासाठी नंबर मध्ये पेज नंबर तर आहेच पण जेव्हा हे पेपर्स आपल्याला रिसिव्ह होतात, आणि याचं जेव्हा स्कॅनिंग होतं ते स्कॅनिंग करताना किंवा कोड बघितला जातो, आणि तो त्या व्यवस्थित नंबर मध्ये पण येतो आणि क्यू. आर.कोड मध्ये पण येतो.यांचा उपयोग स्कॅनिंग साठी होतो. मानवी चुकीमुळे नजर चुकीने समजा दोन पान असे सरकले गेले तरीही त्याच्यामध्ये असे फीचर आहे, ज्याच्यामध्ये मिसिंग पेजेस स्किप होऊ नये यासाठी ते एक अलार्म असतं आणि मग ते मशीन पुढे जात नाही. म्हणजे हे आपण आता नवीन वैशिट्य समाविष्ट केले आहे ओएसएम च्या माध्यमातून आणि त्यामुळे जर ३२ पानाची जर आपली उत्तर पत्रिका असेल तर पूर्णपणे ३२ पान स्कॅन केली जातात. तिथे आपण परत एकदा हे केलेला आहे प्रोटेक्शन आहे. की कुठलही पान मिस होत नाही. तरीही एक आपण एक काळजी घेतलेली आहे, त्यामध्ये त्याला आपण ऑटोडिटेशन फीचर बनतो. ते आपण ओएस मध्ये इम्प्लिमेंट केलेला आहे. तर क्यूआर कोड, बारकोड, टेलीपेस्टिंग, डायनामिक्स पिक्चर एक वेबस ॲप्लिकेशन अदयावत करत आहोत. वेगवेगळ्या टेक्नॉलॉजी वापर करून निकाल लवकर लावण्यासाठी सर्व प्रयत्न करत आहोत. अगदी युद्ध पातळीवर वरती आमचे पूर्ण परीक्षा भवन त्यासाठी कार्यरत असतं तर आपले जे सात जिल्हे आहेत तर काही जवळच्या सेंटर परीक्षा झाले की, त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत काही पेपर्स येतात, पण रत्नागिरी सिंधुदुर्ग मधून पेपर्स येण्यासाठी काही दिवस जातात आणि त्यानंतर स्कॅनिंग केल्यानंतर ओएसएम मध्ये त्या उत्तर पत्रिका येतात आणि त्यानंतर त्या टीचर्सला मिळतात.उत्तर पत्रिका तपासणे सतत चालू असण्यासाठी पूर्ण विभाग आटोकाट प्रयत्न करत असतात. शिक्षकांसाठी आम्ही याबाबत कार्यशाळा देखील आयोजित करत असतो. ज्या-ज्या परीक्षा केंद्रकांवरती किंवा जे शिक्षक आपले उत्तरपत्रिका तपासणार आहेत, त्यांना हे ओएसएम ची पूर्णपणे माहिती मिळावी विस्तृत माहिती मिळावी

टीचरचा टॅगिंग कसं करायचं आहे प्रिन्सिपलच्या लॉगिन मधून सगळ्या टीचरच टॅगिंग करून सब्जेक्ट वाईज त्यांना कसं करायचं आहे, याबाबत सर्व माहिती देतो.

त्यानंतर एक सल्लागार समिती नेमली होती. आपला जे टॉप डाऊन अप्रोच आहे. लीड कॉलेजच्या माध्यमातून म्हणजे आपल्याकडे क्लस्टर आपण केलेले आहेत. ५५ क्लस्टर आहेत आणि लीड कॉलेजेसने खूप चांगली भूमिका निभावलेली आहे.आणि त्या प्रत्येक क्लस्टरमध्ये आठ ते बारा कॉलेजेस ते रोज संध्याकाळी आमचे जे कॅपचे टीम असायची ती प्रत्येक विद्याशाखेप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याचे प्रमाणे एक्सेल शीट जनरेट व्हायच्या आणि कुठल्या विषयाचे किती पेपर्स राहिलेले आहेत. आणि संध्याकाळी हे अपडेट आम्ही लीड कॉलेजेसला देत होतो. शिक्षकांचे व प्राचार्यांचे मी आभार मानते पण सगळ्यात जास्त मला आभार मानायचे आहेत शिक्षकांचे कारण असेसमेंट आणि मार्क हे टीचर शिवाय होऊ शकत नाही, त्यांचे खूप योगदान आहेत, असेसमेंट वेळेत करण्यात आमच्या कॅप मधून किंवा लीड कॉलेजेस मधून किंवा आमच्या सल्लागार समिती कडून फोन आल्यानंतर की इतके पेपर्स आपले राहिलेले आहेत, शिक्षकांनी खूप चांगल्या प्रतिसाद आम्हाला दिलेला आहे. आणि अशा पद्धतीने आम्ही असेसमेंट जितकं जलद आणि चांगलं होऊ शकेल या अनुषंगाने खूप प्रयत्न केलेले आहेत. या सर्वांची खूप खूप मदत झाली. आमची सगळी टीम, असोसिट डीन आणि यामध्ये तर या सगळ्यांनी अतोनात प्रयत्न करून वेळेमध्ये असेसमेंट केल्यामुळे आम्हाला लवकरात लवकर पुढची जी काही प्रोसेस असते. आपली रिझल्ट डिक्लेरेशन करण्याची ती करण्यामध्ये खूप मदत झालेली आहे. एक मॉनिटरिंग कमिटी आम्ही नेमलेली होती. ती मॉनिटरिंग कमिटीने सुद्धा असं काम केलेले. की ज्या शिक्षकांनी पेपर तपासणे केलेलं नाहीये तोपर्यंत त्या दिवसापर्यंत किंवा असे काही कॉलेजेस ज्यांनी पेपर करेक्शन केले नाही, त्यांना ते फोन करत असतात त्यांना मी काही लेटेस्ट वगैरे पाठवले आणि अशा ज्या वेगवेगळ्या कार्यपद्धती आम्ही अवलंबल्या त्यामुळे आपल्याला असेसमेंट मार्गदर्शन थोडं तात्पर करण्यामध्ये मदत झाली. परीक्षा भवन मध्ये पाच वाजता आमची बैठक बसायची आमचे सगळे संबंधित विभाग आणि आमचे ॲडव्हायझर्स ज्या मला ऑनलाईन जॉईन होत असतात रोज आम्ही त्याचा रिव्ह्यू घेत असतात कुठल्या पेपर्स राहिलेत.

**डॉ. सखाराम डाखोरे** यांनी याबाबत उपप्रश्न उपस्थित केला, कि आपले जे पेपर सेटर्स आहेत किंवा एक आणि एक्झामिन्स आहेत त्यांची जी नोंद घेतली जाते ती ऑनलाईन नोंद ते किती कशाप्रकारे व्हॅलिडीटी केले जाते? त्यांची क्वालिटी कशी तपासली जाते ? उत्तर पत्रिका तपासल्या जातात किंबहुना जे प्रश्न पत्रिका तयात केल्या जातात तर या संदर्भामध्ये काही आपण ऑडिट केलंय का त्याची गुणवत्ता कशाप्रकारे तपासली जाते किंवा दर्जा कायम आहे का किंवा त्यासाठी तुम्ही रोड मॅप काही तयार केलेला आहे का ? जेणेकरून उत्तर पत्रिका तपासणी कार्याची गुणवत्ता कायम राहावी या संदर्भात आपण उत्तर त्यावर अशी विनंती केली.

**डॉ. वंदना महाजन** यांनी देखील या एक उपप्रश्न विचारला, कलीन कॅम्पस मधल्या विभागांसाठी विद्यापीठाने काही वर्कशॉप घेतले आहेत का किंवा तुम्ही विभागांना काय नेमक्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, याबाबत माहिती दयावी.

**डॉ. पूजा रौंदळे** (संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ) यांनी उपप्रश्नाचे उत्तर दिले. विद्यापीठाकडे शिक्षकांचा जो डेटाबेस असतो, बोर्ड ऑफ स्टिडीजचा अधिकार असतो आणि त्याच्या अनुषंगातून आपण प्रश्न पत्रिका तयार केले जातात, ते तीन मेंबर्सचे पॅनल असते. यामध्ये एक चेअरमन आणि दोन सदस्य, चेअरमन हे अनुभवी वरिष्ठ सदस्य असतात किंवा त्या विषयातले तज्ञ असतात आणि इथे पहिली स्टेप असते. वरिष्ठांच्या निदर्शनाखालीच प्रश्न पत्रिका तयार होते. येथे आपण गुणवत्ता चेक करतो. परीक्षा भवनाला जो प्रश्न पत्रिका येते, ती गोपनीय असते म्हणजे एकदा मिळालेला पेपर कधीही उघडला जात नाही. परीक्षेला उघडला जात असतो. त्यामुळे परीक्षा होण्याच्या आधी गुणवत्ता आपण तपासू शकत नाही. उत्तर पत्रिका तपासणीसाठी आपल्या कडे शिक्षकांचा डेटाबेस आहे तो अपॉइंटमेंट सेक्शनला सगळ्या कॉलेजेसच्या प्राचार्याकडून मिळतो. तोच डेटा आपण ओएसएम मध्ये असेसमेंटला देत असतो. संबंधित केंद्रावर प्राचार्याच्या लॉगिन मध्ये सदर माहिती अद्ययावत होत असते. साधारण जे शिक्षक तो विषय शिकवत असतात असेच शिक्षक त्या विषयाचे पेपर तपासात. त्याच प्रमाणे मॉडरेट करत असतात.

दुसरा प्रश्न होता कालिना कॅम्पसला विविध विभागाचे आपण पहिल्यांदा ते ऑनलाईन माध्यमाने (ओएसएमच्या) उत्तर पत्रिका तपासणार आहोत. त्या अनुषंगाने तयारी करणार आहोत. ज्या विभागात साधारणतः दहा काम्पुटर आहेत. काही साहित्य हवे असेल किंवा काही कमतरता असेल त्यांची सोय आपण करणार आहोत. आपल्याच मॅन्युस्क्रिप्ट मध्ये त्यांच्या प्रश्न पत्रिका छापून घेण्याची सोय आपण केलेली आहे. ऑनलाईन उत्तर पत्रिका तपासणी संदर्भात आपण लवकरच कार्यशाळा घेणार आहोत.

**मा. कुलगुरूंनी** प्रथम डॉ. सखाराम डाखोरे यांचे अभिनंदन केले, खूप महत्वपूर्ण प्रश्न विचारला आहे. आपले सूक्ष्म निरीक्षण आहे. अशाच प्रकारे प्रश्न अपेक्षित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना, आपण अभ्यासक्रम निर्माण करण्यासाठी विविध कार्यशाळा घेतल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना, आता दुसरा टप्पा प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तपासणी, मॉडरेशन आणि त्याबाबतीतले गुणवत्ता अशी तपासायची याबाबत असणार आहे. उत्तर पत्रिका तपासणे हे रँडम सॅम्पलिंग करून ऑडिट करणे, व ऑडिट करून त्यांचे काय फॉरमॅट बदलू शकतात, ते करणे. दुसरा भाग विद्यार्थ्यांच्या दृष्टीने काहीं फिक्स फॉरमॅट निर्माण करणे. तसेच सगळ्या सेमिस्टर ह्या मेमरी बेसच असाव्यात का, त्याच्या साठी काही Analytical Tools असाव्यात, हे देखील तपासत आहोत. याच प्रमाणे एन्ड सेमिस्टर परीक्षेसाठी पण एकच फॉरमॅट असावा अशी सुरुवात केली आहे, Continuous Assisment कोणत्याही प्रकारचे 80:20, 60:40, 50:50, असले तरी NEP2020 च्या प्रमाणे परीक्षा घेऊन त्याचे रूपांतर करण्यासाठी अभ्यासमंडळाने त्यास मान्यता दिली आहे. त्यासाठीची कार्यशाळा लवकरच घेणार आहोत.

**बाब क्रमांक : ३ विद्या परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३३ (त) अन्वये मंजूर करण्यात आलेला वार्षिक बृहत आराखड्यामधील नवीन महाविद्यालयांच्या स्थानबिंदू निश्चितीच्या प्रस्तावातील परिशिष्ठ १ नुसार दिलेली मंजुरीची प्रत शिफारशीसहित कलम २९ (ज) अन्वये अधिसभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.**

ठराव :- मा. अध्यक्षांच्या निर्देशानुसार कुलसचिवांनी "विद्यापीठाचा बृहत आराखडा" सभेच्या पटलावर मांडला. तसेच मा. प्र-कुलगुरू विद्यापीठाच्या बृहत आराखड्याचे सभागृहात सादरीकरण करतील असे घोषित केले. या सादरीकरणापूर्वी सभासदांनी आपले या आराखड्याच्या संदर्भात कार्य पद्धतीबाबत आपली मते मांडली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसारच हा आराखडा बनविला गेल्याचे मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहाला अवगत केले व हा आराखडा सभागृहापुढे मांडला. या आराखड्यास प्रा.डॉ. कविता लघाटे यांनी अनुमोदन दिले.

या सर्व सदस्यांच्या मतप्रदर्शनानंतर मा. कुलगुरू यांनी चर्चेस अनुसरून संबोधन केले. विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा व भविष्यात केल्या जाणाऱ्या उपाय योजनांचा आढावा घेतला. कौशल्यपूर्ण अभ्यासक्रमाच्या भविष्यातील विस्तारीकरण व विद्यापीठाची त्या बाबतीत असणारी समज यांचाही त्यांनी आढावा घेतला. नवीन शैक्षणिक धोरण संदर्भांत विद्यापीठ कार्यपद्धतीमध्ये कराव्या लागणाऱ्या बदलांचाही भविष्यवेध त्यांनी घेतला व सभासदांना या आराखड्यास मंजूर करावे अशी विनंती केली. आवाजी मतदानाने हा आराखडा मंजूर केला असे अध्यक्षांनी घोषित केले.

“शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता वार्षिक बृहत आराखड्याचा मसुदा मा. प्र-कुलगुरू यांनी अधिसभेत सादर केला. त्यास प्रा.डॉ. कविता लघाटे यांनी अनुमोदन दिले. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३५/वि.शि.५ दिनांक ११/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार "विद्यमान सन २०२५-२६ रोजीच्या वार्षिक बृहत आराखड्याकरिता शैक्षणिक संस्थांनी नवीन महाविद्यालय स्थापन करण्याकरिता इतर नवीन स्थळबिंदू सुचविले असल्यास सदरहू नवीन स्थळबिंदूचा समावेश सन २०२५ – २०२६ च्या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये करण्यात येऊ नये" असा उल्लेख आहे. त्यामुळे वार्षिक बृहत आराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (झ) व कलम १०७ (५) नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये नवीन महाविद्यालयाचे मागील बृहत आराखड्यातील १३ तसेच कक्ष आधिकारी यांच्या पत्रानुसार प्रपत्राप्रमाणे २ रिक्त बिंदू असे एकूण १५ बिंदू बिंदूच्या शिफारशीनुसार (परिशिष्ट -१ ) दिनांक १० जुलै २०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीसं व्यवस्थापन परिषदेने

मान्यता दिली. तद्नंतर दिनांक १२ जुलै २०२४ रोजीच्या विद्वत परिषदेच्या बैठकीमधील बाब क्र. २. १ अन्वये सुधारित शिफारशी मान्य करण्यात आली. विद्वत परिषदेच्या शिफारशी दिनांक २० जुलै २०२४ रोजी अधिसभेत ठेवण्यात आल्या व शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिताचा वार्षिक बृहत आराखड्याचा मसुदा अधिसभेच्या मंजुरीसह सुधारित परिशिष्ट 'अ' नुसार शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात आली. सोबत अधिसभेने मंजूर केलेले परिशिष्ट 'अ' जोडलेले आहे.

**Point of Order**

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी पॉईंट ऑफ ऑर्डर मांडताना, आयडॉल संस्थेबाबत समाजमाध्यमावर आलेल्या एका पोस्ट बाबत सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच मा. कुलगुरूंनी याबाबत विद्यापीठस्तरावर चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी केली.

**श्री. धनेश सावंत** यांनी विद्यापीठाच्या संबंधित विविध संघटना व त्यांचा विद्यापीठाच्या कर्मचारी व आधिकारीयांवर वाढता दबाव/ दमदाटी/ अरेरावी, याबाबत चिंता व्यक्त केली. त्यांनी विद्यापीठाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना संरक्षण मिळावे अशी मागणी केली.

**डॉ. वसंत माळी** यांनी देखील विद्यापीठाच्या प्रतिमा मलिन करण्याऱ्या संघटनावर कारवाई बाबत काही नियम करण्याबाबत मागणी केली.

**मा. प्र-कुलगुरूंनी** उत्तर देताना माहिती दिली कि अधिसभा सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे. विद्यापीठाच्या विविध पदांवर बसलेले अधिकाऱ्यांची बदनामी होते आहे, असे वेगवेगळे उदाहरण देऊन त्यांनी मांडले आहे. काही सदस्यांनी असे सांगितलं की विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये अधिकारी / कर्मचाऱ्यांचा अपमान केला जातो, त्यांच्या कामकाजामध्ये व्यत्यय आणला जातो. खूप दखल अंदाजी केली जाते. वारंवार कर्मचारी/ अधिकाऱ्यांचा अपमान केला जातो. असे विविध गोष्टी त्यांनी सांगितले आहेत. आता या गोष्टी सांगताना प्रशासनाच्या असं लक्षात येतंय की या गोष्टी जेव्हा करतात तेव्हा ते फेसबुक वर किंवा व्हाट्सअप वर समाज माध्यमातून ते गोष्टी करत असतात. त्यातल्या काही गोष्टी प्रशासनाच्या समोर येतात काही गोष्टी प्रशासनाच्या समोर येत नाही. आणि त्यामुळे अशावर तात्काळ कार्यवाही करणे किंवा त्यांच्यावर काही प्रतिक्रिया करणे होत नाही.

परंतु आता या अधिसभेच्या मंचावर या गोष्टींची चर्चा झाली त्यातल्या मुद्दे मांडले या अनुषंगाने आपण नक्कीच एक वकिलांचा सल्ला घेऊन त्याच्यावर काय कारवाई करता येईल हे करू. कारण कोणाचे चारित्र्य हनन करणे,विद्यापीठाची बदनामी करणे, वैयक्तिक धमक्या देणे, विद्यापीठाच्या कामकाजात हस्तक्षेप करणे, अशा विविध गोष्टी आहेत. या क्षेत्रात वरिष्ठ व्यक्तींचा कायदेशीर सल्ला घेऊन, संबंधितांवर कारवाई करू.

**मा. कुलगुरूंनी** याबाबत सुद्धा याबाबत परखड मत व्यक्त केले, विद्यापीठाची प्रतिमा जाणीव पूर्वक मलिन करणाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल. याबाबत कायदेशीर बाजू तपासून लवकरच कार्यवाही करण्यात येईल, असे सभागृहास सांगितले.

**मा. प्र-कुलगुरूंनी** श्री. भूषण मर्दे यांनी एक प्रश्न विचारला होता कि विद्यापीठात काम करणाऱ्या कुठल्याही कर्मचाऱ्याला फेसबुक वर किंवा व्हिडिओ टाकून, कायदेशीर/राजकीय पक्ष/इतर बाबतीमध्ये मत व्यक्त करता येतं का? या बाबत विद्यापीठ प्रशासन त्यांच्याशी वैयक्तिक चर्चा करू आणि ते कोण आहे काय आहे, त्याची माहिती घेऊन कायदेशीर सल्ला घेऊन, योग्य ती कारवाई करू.

**बाब क्रमांक :४** मे. किशोर ॲण्ड कंपनी (सी.ए.) यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२२ चा ताळेबंद व लेखापरीक्षण अहवालावरील व्यवस्थापन परिषदेने दिलेली स्पष्टीकरणे अधिसभेच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव** वित्त व लेखा समितीच्या दि. ११ जुलैच्या रोजीच्या बाब क्र. संपन्न झालेल्या सभेत विद्यापीठाचा सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२२ चा ताळेबंद मे. किशोर ॲण्ड कंपनी (सी.ए.) यांचा लेखापरीक्षण अहवाल व त्यात उपस्थित केलेल्या मुद्द्यांना वित्त व लेखा समितीने दिलेल्या स्पष्टिकरणासह मंजूर केले. व दिनांक १२ जुलै २०२४ रोजीच्या बाब क्र ४ नुसार व्यवस्थापन परिषदेत उपरोक्त ताळेबंद व लेखापरीक्षण अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात आला होता. मुंबई विद्यापीठाचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२२ चा ताळेबंद व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत एकमताने मान्य करण्यात आला.

**स्थगन प्रस्ताव -१**

**प्रा. जितेंद्रनाथ गोकुळनाथ झा** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला.

"University of Mumbai the adjourn for 10 minutes to express gave concern of the house at the pending issue of examination and reform streamlining of the process required to the carried out urgently specially in the field of issue of hall tickets and that examination time table. It has been observed that examination time table has given quit of last moment and also with respect of remuneration both of University level and college level.

**डॉ सखाराम डाखोरे** यांनी वरील स्थगन प्रस्तावास अनुमोदन दिले.

**डॉ. वसंत माळी** यांनी मुंबई विद्यापीठात बाहेर गावावरून येणाऱ्या प्राध्यापकांची राहण्याची सोय नसल्याबद्दल खंत व्यक्त केली. याबाबत विद्यापीठाने काही ठोस निर्णय घेण्याची विनंती प्रशासनास केली.

**डॉ चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी उत्तर पत्रिका तपासणी मानधन तातडीने ऑनलाईन जमा करणे बाबत विनंती केली. उत्तर पत्रिका तपासणी बाबत काही सूचना मांडल्या. तसेच

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उत्तरपत्रिका तपासणी बाबत काही धोरण अद्यवत करावे, अशी विनंती केली.

**डॉ सत्यवान सुधाकरराव हाणेगवे** यांनी पदवीच्या प्रथम व व्दितीय वर्षाच्या परीक्षेच्या वेळापत्रक संबंधी काही सूचना मांडल्या. महाविद्यालयामध्ये पदवीच्या प्रथम व व्दितीय वर्षाच्या परीक्षा चालू असतात. त्या परीक्षांचे उत्तर पत्रिका तपासणीचे काम चालू असते, तेव्हाच तृतीय वर्षांच्या परीक्षेच्या काम सुरु होते. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने प्रथम व व्दितीय वर्षाच्या परीक्षाच्या कामासाठी अंतिम तारीख देता येईल का. त्यामुळे तृतीय वर्षांच्या परीक्षेच्या कामामध्ये व्यत्यय येणार नाही. असे सुचविले. तसेच महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना उत्तर पत्रिका घरी बसून देखील तपासता यावी, यासाठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा हि विनंती केली.

**डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.)** यांनी प्रश्नाचे उत्तर देताना माहिती दिली कि या चुका होणार नाही यासाठी आपण काळजी घेऊ. तसेच चेअरमन आणि प्रश्न पत्रिका तयार करणारे प्राध्यापक प्रश्न पत्रिका सील करताना विशेष काळजी घेतील.

**डॉ सखाराम डाखोरे** यांनी प्रश्न पत्रिका तयार करताना अभ्यासक्रम पाठविण्याची विनंती केली.

**डॉ. वंदना महाजन** यांनी अध्यक्षांना विंनती केली कि आपण किती वर्षा पर्येंतच्या प्रश्नपत्रिका काढू शकतो याबाबत माहिती द्यावी.

**डॉ. अनिल सिंग** यांनी याबाबत उत्तर दिले कि मा. कुलगुरु याबाबत बोर्ड ऑफ डीन मध्ये लवकरच निर्णय घेतील.

**डॉ कविता लघाटे** यांनी या प्रश्नाचे उत्तर देताना माहिती दिली की आपल्या सर्वांच्यात पहिले लक्षात आलेला आहे की अनेक प्रश्न पत्रिका आपण काढतो पुष्कळ वेळा त्या प्रश्नापत्रिके करता विद्यार्थ्यांनी फॉर्म भरलेला नसतो. आणि परीक्षा विभागांमध्ये आपण अनेक प्रश्नपत्रिका काढतो. त्या तीन सेट मध्ये काढतो. हे सगळं लक्षात आल्यानंतर बोर्ड ऑफ डीन मध्ये एक चर्चा झाली आणि त्याच्यावरती असं निश्चय करतो आहे की प्री आणि पोस्ट एनीइपी मध्ये जी जे विषय आता आपण ते कोर्सेस आपण करतो आहोत. त्याला समान बॅलन्स त्या त्या परीक्षेचा कुठला असेल आणि त्याकरीता बैठक ठरली आहे. त्याच्यामध्ये माननीय कुलगुरू सर मार्गदर्शन करतील. पुढच्या आठवड्यामध्ये प्रत्येक दिवस आणि त्यांच्या मेंबर्सची मीटिंग होऊन आपल्या अभ्यासक्रमाच्या आपल्या विषयाच्या जितक्या परीक्षा होतात त्या सगळ्या परीक्षांना आपण एनइपी मध्ये कुठला इथे समान प्रश्न पत्रिका देणार आहोत. हे जर ठरलं तर ही जी मोठी एक्सरसाइज आपण करतो ती कमी होईल.

**प्र-कुलगुरूंनी** झा सरांच्या प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले कि उत्तर पत्रिका तपासण्याचे मानधन लवकर मिळेल असे, प्रयत्न करू. व स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

विनंतीस मान देऊन **प्रा. जितेंद्रनाथ गोकुळनाथ झा** यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

स्थगन प्रस्ताव -२

**मा. प्र-कुलगुरूनी सुतार सरांना विनंती केली कि त्यांनी त्यांचा व सत्यवान हाणेगवे यांचा स्थगन प्रस्ताव एकत्र करावा.**

**डॉ हनुमंत एकनाथ सुतार यांनी** बी.कॉम. मध्ये इन्व्होर्मेन्ट स्टडीज हा विषय अनिवार्य म्हणून शिकवला जायचा, परंतु आता एनइपी मध्ये हा विषय ऐच्छिक विषय म्हणून शिकवला जातो. सर्वोच्च न्यालयानाने एका आदेशात, सर्व पदवी अभ्यासक्रमासाठी इन्व्होर्मेन्ट स्टडीज  हा विषय अनिवार्य केला आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे हि पत्र आहे. या संबंधी विद्यापीठाने ठोस निर्णय लवकर घ्यावा, अशी विनंती केली.

तसेच ज्या अनुदानित महाविद्यालयात जे विषय अनूदानित आहे ते सर्व विषय त्या महाविद्यालयाने मेजर म्हणून विद्यार्थांना देणे आवश्यक आहे, असे होताना दिसत नाही, त्यामुळे याबाबत विद्यापीठाने तात्काळ परिपत्रक काढून सर्व अनुदानित महाविद्यालयांना उपरोक्त सूचना दिल्या पाहिजे. सहायक प्राध्यापकाचा वर्क लोड संबंधी सध्या स्पष्टता नाही, कृपया यासंबंधी लवकर मार्गदर्शन करावे.

**डॉ सत्यवान हाणेगवे** यांनी बी.कॉम. प्रथम वर्षाला कम्युनिकेशन स्किल व इंग्लिश विषय आणि त्याच्या वर्कलोड मधील तफावत बाबत सभागृहाचे लक्ष वेधले. तसेच याबाबत ठोस निर्णय घ्यावा अशी विनंती केली.

**मा. प्र-कुलगुरूनी** सत्यवान हाणेगवे यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना माहिती दिली की सत्यवान सरांनी जो मुद्दा मांडला आहे, त्याबाबतीत परिपत्रकावर मा. कुलगुरूंनींची सही झालेली आहे. ते परिपत्रक लवकरच निर्गमित होईल.

**डॉ. अनिता कनवर** यांनी डॉ. सत्यवान हाणेगवे व डॉ. हनुमंत सुतार यांच्या स्थगन प्रस्तावास अनुमोदन दिले.

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** विज्ञान विद्याशाखेवर झालेले आक्रमणाबाबत चिंता व्यक्त केली. एनइपी च्या माध्यमातून काही नावीन्यपूर्ण कोर्सेस आणता येतील का हे विचारले. इतर विद्यापीठे आपले विद्यार्थी पळवत आहेत कारण त्यांचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट हे खूप स्ट्रॉंग आहे, याबाबत लक्ष वेधले.  इंजिनिअरिंगच्या ऍडमिशन बाबत देखील खंत व्यक्त केली, सीइटी व प्रवेश प्रक्रिया वेळ खाऊ आहे, त्याबाबत सरकारकडे सवांद साधावा अशी विनंती केली.

**डॉ सखाराम डाखोरे** यांनी सदर प्रस्तावास अनुमोदन दिले. त्यांनी सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४४  नुसार सध्या आपल्या विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर शिक्षण मंडळ स्थापन नाही. याबाबत सभागृहाचे लक्ष वेधले, हे मंडळ लवकर स्थापन करावे आणि  तसेच बऱ्याच महाविद्यालया मध्ये मराठी विषयाचे विद्यार्थी कमी होत आहेत, कृपया या बाबत उपाय योजना करावी, हि विंनती केली.

**डॉ वसंत माळी** गाईड साठी पीजी शिक्षक म्हूणन अनुभव लागतो, परंतु इतर विद्यापीठाचा अनुभव नाकारण्यात येतो. प्रशासनला विनंती केली की इतर  विद्यापीठातून

पदवीउत्तर शिक्षक म्हणून अनुभव ग्राहय धरण्यात यावा. विद्यापीठाची पेट लवकर घेण्यात यावी.

**डॉ कविता लघाटे** यांनी प्रश्नांचे उत्तर देताना माहिती दिली की ओपन इलेक्टीव्हच्या बास्केटमध्ये भूगोल विषय दिलेला आहे. हा विषय ओपन इलेक्टिव्ह दोन क्रेडिटचा कोर्स आहे. व्हॅल्यू एज्युकेशन जे पाचव्या वर्टीकल मध्ये घेतो, त्या ठिकाणी सुद्धा दोन इवीएस चे कोर्सेस अपलोड करत आहोत. व्हॅल्यू एज्युकेशनच्या बोर्डाची माध्यमातून सुद्धा दोन पाचव्या वर्टीकलमध्ये ज्याच्यामध्ये एईसी, वीसी, आयकेएस आहे. तिथे पण दोन येतात आहेत. दोन अधिक दोन म्हणजे चार क्रेडिटचे कोर्सेस तयार केले आहेत. काही विषय लवकरच अपलोड होतील.

विद्यापरिषदेच्या बद्दल मा कुलगुरूंनी सांगितलं, लवकरच परिपत्रक येणार आहे. त्याच्यामध्ये तीन महत्त्वाचे मुद्दे आहेत. सगळ्यात पहिला म्हणजे इंग्रजी आणि इतर भारतीय भाषा त्याच्या करिता आपण सुरुवातीला ठरवलं होतं. की पहिला दुसऱ्या सेमिस्टर मध्ये पहिले इंग्रजी आणि नंतर दुसरी भाषा, तिसऱ्या सेमिस्टर आणि चौथ्या सेमिस्टर मध्ये त्याच प्रकारे करावं पण ज्या वेळेला लक्षात आलं की दुसऱ्या सेमिस्टर मध्ये इंग्रजी विषयाच्या प्राध्यापकांचा वर्कलोड कमी होईल. त्याच्यामुळे आपण विद्यापरिषदे मध्ये निर्णय घेतला आहे की पहिल्या आणि चौथ्या सेमिस्टर मध्ये इंग्रजी ही भाषा मध्ये आणि दुसऱ्या आणि तिसऱ्या सेमिस्टर मध्ये इतर कुठलीही आधुनिक भारतीय भाषा, जे विद्यार्थी निवड करतील. ती शिकवण्यात येईल. दुसरा मधला मुद्दा असा येणार आहे की या मॅथेमॅटिक्स आणि ज्या भाषा आपण शिकवणार आहोत. त्याच्या करता प्रॅक्टिकल किंवा ट्युटोरियल मोड मध्ये असायला हवं, हे सुद्धा आपण मान्य करत आहोत. दोन क्रेडिटचे जे कोर्सेस असतील ते त्या करता एक क्रेडिट आपण थेअरी आणि एक क्रेडिट जो असेल जो प्रॅक्टिकल अप्रोच किंवा ट्युटोरियल अप्रोच मध्ये ते बॅचेस मध्ये जी काय आपल्याला दिलेली असेल त्याप्रमाणे करावे. जेणेकरून एका वेळेला कम्युनिकेशन स्किल १२० विद्यार्थ्यांना पण देऊ शकणार नाही हे आपणा सर्वांना माहित आहे. ते बॅचेस मध्ये जावे लागेल. मॅथेमॅटिक्स हे जे विषय कॉमर्स फॅकल्टी मध्ये आपण देतो. आपण तिथे दिलेले आहेत जास्त ५० टक्के मेजरचे क्रेडिट्स व्हायला हवे त्यामध्ये आपण कॉमर्समध्ये जर मॅथमॅटिक्स चे व्हीएससी किंवा एएससी घेतले तर ते आपण त्याच्यात समावेश करू या प्रकारे आपण चर्चा केलेली आहे आणि तसं आपण विद्यार्थ्यांना देऊ शकू. तिसरा जो मुद्दा त्याच्यामध्ये घेणार आहे तो की आपण आतापर्यंत आपला विषय मेजर मायनर किंवा अशा पद्धतीमध्ये न शिकवता आपण त्या-त्या विषयाचं पदवी मध्ये शिकवत होतो. आपलाच विषय चार ठिकाणी आपण पहिला वर्टीकल्स मध्ये शिकवू शकणार आहोत. पहिला मेजरमध्ये मेजर बरोबर VSC, ASC मध्ये सुद्धा तो आपण शिकवणार आहोत. दुसऱ्या फॅकल्टी मध्ये किंवा आपल्याच सायकलच्या दुसऱ्या विषयाच्या विद्यार्थ्यांकरता आपण आपला विषय मायनर म्हणून देणार आहोत. आणि ओइ मध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारचे खूप सुंदर अशा बास्केट्स आपण तयार केलेले आहेत. कदाचित आपण आपल्या वेबसाईट वरती बघितलं

असेल ओपन इलेक्टीव्ह बास्केट आहे ती अत्यंत समृद्ध अशी झालेली आहेत. आपण सर्वांनी आपल्या विषय जसा त्यांनी आपण करतो आहोत आणि ऑफर करायचा प्रयत्न करतात तसा इतर भाषा आणि इतर विषयांच्या सुद्धा खूप चांगले कोर्सेस आपल्यापर्यंत आलेले आहेत. आणि बहुविद्याशाखीय हे दोन जे व्यवच्छेदक लक्षण आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून आपण करू इच्छितो. त्याच्याकरताही लवचिकता आणि वेगवेगळया प्रकारचे अभ्यासक्रम महत्त्वाचे ठरणार आहेत. आपल्या लक्षात येईल की बहुविद्याशाखीय आणि लवचिकता हे दोन महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आपल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता खूपच पूरक ठरतील असा विश्वास वाटतो.

**मा प्र-कुलगुरूंनी** स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

**डॉ. वसंत माळी** यांनी अनुदानित महाविद्यालय अनुदानित विषय मेजर म्हणून उपलब्ध करून देत नाही, याबाबत खंत व्यक्त केली. विद्यापीठाने याबाबत ठोस निर्णय घेण्याची विंनती केली.

**डॉ अनिता कनवर** यांनी अनुदानित महाविद्यालयांना अनुदानित विषय मेजर म्हणून घ्यावा किंवा नाही हा निर्णय प्राचार्यांवर सोडला पाहिजे असे मत व्यक्त केले.

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी अनुदानित महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक रेशो बद्दल चिंता व्यक्त केली. याबाबत विद्यापीठाने राज्यपालाकडे निवेदन सादर करावे की अनुदानित पदे भरणे किती गरजेचे आहे.

**प्र-कुलगुरू** सरांनी सुतार सरांच्या प्रश्नांचे उत्तर देताना माहिती दिली की मा. कुलगुरू सर व मी स्वतः एनइपी बाबत सर्व महाविद्यालयांना कार्यशाळा घेत असतो. शिक्षकांमध्ये एनइपी बाबत काही विषय सरप्लस होणार का हि भीती आहे, परंतु असे काही नाही कोणताही शिक्षक सरप्लस होणार नाही. याबाबत तुम्ही कुढलीच भीती मनात ठेवू नका. जेव्हा कुठलीतरी नवीन पॉलिसी येत असते नवीन सिस्टम येत असते तर नवीन सिस्टम मध्ये सुरुवातीला काहीतरी आपल्याला शंका वाटत असते काहीतरी भीती वाटत असते. आपल्याला माहिती आहे की नॅशनल एज्युकेशन पॉलिसीचे इम्प्लिमेंटेशन झालेला आहे. त्याच्यामध्ये आपल्या सन्माननीय कुलगुरू सरांचा रिपोर्ट होता. त्या रिपोर्ट वरच पूर्ण महाराष्ट्र काम करत आहे. सुकाणू समिति नेमली आहे. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी इम्प्लिमेंट करण्यासाठी त्याच्यात पण कुलगुरू त्यांचे प्रमुख भूमिका आहे.या बाबत कुणाची काही तक्रार असल्यास आम्ही मार्गदर्शन करू. सुतार आणि हाणेगवे सरांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

**डॉ. हनुमंत सुतार आणि सत्यवान हाणेगवे** यांनी विंनतीस मान देऊन स्थगन प्रस्ताव मागे घेतला. तसेच डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी देखील स्थगन प्रस्ताव मागे घेतला. त्यांनी मा. कुलगुरू सरांचे अभिनंदन केले. मा. कुलगुरूनी अभियांत्रिकी महाविद्यालय मध्ये ज्याप्रमाणे एनइपी आले त्यासाठी मा. कुलगुरूंनी खूप मेहनत घेतली आहे. त्याचे खूप कौतुकच आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रम हा भारत भर आदर्श अभ्यासक्रम म्हणून बघतील जाईल, असे मनोगत व्यक्त केले.

**स्थगन प्रस्ताव – ३**

**डॉ. जगन्नाथ किसान खेमनर** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला. "This meeting of the University of Mumbai Senate is a adjourned for 20 minutes to express by grave of concern of house hard ship face by the teachers of aided and unaided college courses run by University and college"

महाविद्यालयातील प्राध्यापक भरती साठी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा अशी विंनती केली. कॅस च्या बाबतीत मुंबई विद्यापीठाचे दिनांक १ जुलै २०२४ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात यावे अशी मागणी केली. उपरोक्त प्रस्तावास **डॉ. सखाराम डाखोरे** यांनी अनुमोदन दिले. त्यांनी पी.एचडी. विद्यार्थी व गाईड बाबत काही समस्या मांडल्या. कॅस संबंधी विद्यापीठाच्या एक्स्पर्टच्या लिस्ट अदयवत नाहीत कृपया याची नोंद घ्यावी. अशी विनंती केली. त्यांनी पी.एचडी. विद्यार्थी व गाईड बाबत काही समस्या मांडल्या. आपण दोन सेमिस्टरच्या परीक्षा फीस आधीच घेतो, त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय होतो, याबाबत काही विचार करण्यात यावा. अशी विनंती केली.

**डॉ. विजय पवार** यांनी विनानुदानित प्राचार्य, सीएचबी शिक्षकांचे विद्यापीठ मान्यता, एपीआय व्हेरिफिकेशन बाबत त्यांचे विचार मांडले.

**डॉ. वंदना महाजन** यांनी विद्यापीठाच्या संशोधन केंद्राबाबत काही समस्या मांडल्या, याबाबत विचार करण्याची विनंती केली.

**मा. प्र-कुलगुरूनी** याबाबत उत्तर देताना माहिती दिली की विनानुदानित महाविद्यालय मध्ये बिंदुनियामावली प्रमाणे जाहिराती दिल्या जातात. सर्व प्रक्रिया राबवली जाते. अनुदानित / विनानुदानित असा भेदभाव केला जात नाही. कृपया याबाबत गैरसमज करू नये. जे महाविद्यालय नियम न पाळता जाहिराती देत असतील त्यांची माहिती द्या. अश्या महाविद्यालयाला समज देण्यात येईल. अनुदानित महाविद्यालयात सीएचबी प्राध्यापकाचा पगार शासन देते, आणि सीएचबी शिक्षकांचे पगार देताना त्यांना नियमाप्रमाणे जाहिरात देणे गरजेचे आहे. त्यामुळे जाहिरात शिक्षक मान्यता हे नियमाप्रमाणे देणे, आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचा जो विषय आहे, Refresher Course आणि Orintation Course संदर्भात. त्याबाबत परिपत्रक लवकरात लवकर निघेल. आणि त्यानी स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

**डॉ. जगन्नाथ किसान खेमनर** यांनी विंनतीस मान देऊन स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**स्थगन प्रस्ताव – ४**

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी स्थगन प्रस्ताव सादर करताना, **मा. कुलगुरु** सरांचे अभिनंदन केले. ज्या पद्धतीने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये एनइपी लागू करण्यात आले. ते खुप कौतुकास्पद आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी तयार केलेला अभ्यासक्रम संपूर्ण भारत आदर्श ठरेल. त्यांनी मा. कुलगुरूच्या अभिनंदनाचा प्रस्ताव अधिसभेपुढे सादर केला.

त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयात सातव्या वेतन आयोग लागू न केल्या बद्दल खंत व्यक्त केली. महाविद्यलयाच्या मनमानी कारभाराबद्दल तक्रार केली. आणि कॅस प्रकरण प्रलंबित आहेत.कॅसचा ॲरियर्स याबाबत देखील विद्यापीठाने गांभीर्याने दखल घेऊन. तात्काळ

परिपत्रक काढावे, अशी विनंती केली. AICTE च्या नियमाप्रमाणे अभियांत्रिकी महाविद्यालयात दुसऱ्या विषयाचे प्राध्यापक देखील एखाद्या विषयासाठी पात्र आहेत, त्या बाबत परिपत्रक काढावे, अशी मागणी केली.

**डॉ. सखाराम डाखोरे** यांनी उपरोक्त प्रस्तावास अनुमोदन दिले. तसेच त्यांनी मा. कुलगुरूच्या अभिनंदन प्रस्तावास देखील अनुमोदन दिले. त्यांनी मा. कुलगुरू हे महाराष्ट्रातील एनइपीचे जनक आहेत, असा गौरव केला. त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, पालक, प्राचार्य किंवा इतर शैक्षणिक व्यक्तीसोबत सतत चर्चा करून ज्या प्रमाणे एनइपीची अंमलबजावणी महाराष्ट्रात केली, हे सामान्य माणसाचे काम नाही. हे उत्कृष्ट व्यक्तीचे काम आहे, असे मत व्यक्त केले. सभागृहाचे याची नोंद घ्यावी. अशी विनंती केली.

**मा. प्र-कुलगुरूंनी** सदर प्रस्तावांचे उत्तर दिले. महाविद्यालयाच्या समस्या बाबत लवकर निर्णय घेतला जाईल. याबाबतीत लवकरच विद्यापीठाचे परिपत्रक निघेल. आम्ही सर्व महाविद्यालयांच्या समस्यां सोडविण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करत असतो. महाविद्यालयाच्या विविध समिती मध्ये आम्ही शिक्षक प्रतिनिधी देत असतो. त्यामुळे शिक्षकांवर अन्याय होणार नाही याची काळजी आम्ही घेत असतो. परंतु आम्हाला प्रशासन म्हणून प्राचार्य, महाविद्यालय प्रशासन यांची देखील बाजू एकूण घ्यावे लागते. त्यामुळे प्राचार्य जरी त्यांच्या समस्या सांगत असतील तर त्या बद्दल गैरसमज करू नये.

**मा. कुलसचिव** यांनी डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी विंनतीस मान देऊन स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**स्थगन प्रस्ताव – ५**

**डॉ. विश्वंबर जाधव** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला. त्यांनी मुंबई विद्यापीठातील प्राध्यापकांचे डीसीपीएस / एनपीएस खाती न उघडल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. काही प्राध्यपकांना त्यांचे जमा केलेले रक्कम परत मिळाली तर काहींना मिळाली नाही. डीसीपीएस / एनपीएस अकाउंट असणे हे प्राध्यापकाचा हक्क आहे. गेली अनेक वर्ष हा प्रश्न सुटलेला नाही. त्यांनी विंनती केली कि त्या बाबत तात्काळ निर्णय घ्यावा.

**डॉ. वंदना महाजन** यांनी उपरोक्त प्रस्तावास अनुमोदन दिले.

**मा. कुलगुरूंनी** उत्तर देताना माहिती दिली की २०१३-१४ भरती मधील अनुदानित पदांची झाली त्यामध्ये १२१ प्रकरण होती. महाराष्ट्र शासनाच्या वेळोवेळी आलेल्या सूचनानुसार आपन काही प्रकरणे निकाली काढली. काही एनपीएस,डीसीपीएस, तर काही जीपीएफ प्रकरणे आहेत, एकूण ११७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. थोढीच प्रकरणे प्रलंबित आहेत. लवकरच हि प्रकरणे निकाली काढण्यात येतील. सेल्फ फायनासची ४२ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे, अजून काही प्रकरणे शिल्लक असल्यास पुढील आठवड्यात बैठक घेउन प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न करू.

**मा. प्र-कुलगुरूंनी** डॉ. विश्वबर जाधव यांचा दुसरा स्थगन प्रस्ताव व डॉ. विनोद कुमरे यांचा स्थगन प्रस्ताव एकत्र मांडण्याची सूचना केली.

**स्थगन प्रस्ताव – ६**

**डॉ. विनोद लक्ष्मणराव कुमरे** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला. २०१३ नंतर खरंच ज्या लोकांचं केस राहिलेलं होतं ते बऱ्यापैकी आपण मार्गी लावलेले आहेत. परंतू अद्याप हि काही प्रकरणे प्रलंबित आहेत. वेळेत प्रकरणे निकाली काढली तर प्राध्यापकांना इतर लाभ लवकर मिळेल. त्यांनी मा. कुलगुरूंना विनंती केली की आपल्या स्तरावरून जर काही विभागाला सूचना देता आल्यास संबंधित विभागाला की वर्षातून किमान दोन ते तीन वेळा कॅस च्या बैठका घ्याव्या. कारण काहीं प्रकरणात कॅसच्या मुलाखती होऊन देखील त्याचा आर्थिक लाभ वर्ष- दीड वर्ष मिळत नाही.

**डॉ. विश्वंबर जाधव** यांनी उपरोक्त प्रस्तावास अनुमान दिले. अनुमोदन

**डॉ. वंदना महाजन** यांनी बाळ आपटे अध्यासनाची जागा विद्यापीठाने काढलेली आहे, पण गुरुदेव टागोर तौलनिक अध्यासनाची मान्यता प्राप्त प्राध्यापक पदाची जागा का काढण्यात आली नाही, असे विचारले. प्राध्यापक हरिश्चंद्र थोरात निवृत्त झाल्यानंतर ही जागा निघालेली नाही, अशी माहिती सादर केली.

**स्थगन प्रस्ताव – ७**

**डॉ. विजय पवार** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला. पेंढारकर महाविद्यालयाच्या समस्येविषयी मा. कुलगुरूंनी तात्काळ दखल घेऊन कारवाई केली, त्याबद्दल त्यांनी मा. कुलगुरूंच्या आभार मानले. तसेच कॅस प्रकरणे प्रलंबित राहू नये, यासाठी काही उपाययोजना त्यांनी सभागृहात मांडल्या.

सर्व प्रथम **मा. प्र-कुलगुरूंनी** उत्तर देताना नाराजी व्यक्त केली की विद्यापीठ प्रशासन कॅस प्रकरणात अतिशय सक्रियपणे काम करून देखील अधिसभा सदस्य कॅस प्रकरणाबाबत बोलतात, हे अतिशय वेदनादायक आहे. मा. कुलगुरू सर, हे प्र-कुलगुरू असताना ४० प्रस्ताव कॅसचे प्रलंबित होते, तेंव्हा स्वतः त्यांनी सर्व प्रकरणे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहे. त्यापैकी ३६ प्रकरणे निकाली देखील काढण्यात आली आहेत. फक्त आर्थिक लाभ देण्यासाठी हि बाब जेव्हा व्यवस्थापन परिषदेपुढे आली, त्या वेळी असा निर्णय झाला की व्यवस्थापन परिषदेचे पूर्ण गठन झाल्यानंतर सदर बाब पुन्हा व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी. त्यामुळे सदर निर्णय झालेला नाही. परंतु काळजी करण्याचे कारण नाही, लवकरच व्यवस्थापन परिषद पूर्ण गठन होईल. आणि सर्व प्रकरणे निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

**डॉ. विजय पवार** आणि **डॉ. विश्वंबर जाधव** यांनी यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला. तसेच **डॉ. विनोद कुमरे** यांनी देखील स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**स्थगन प्रस्ताव – ८**

**डॉ. वंदना महाजन** यांनी पुढील प्रमाणे स्थगन प्रस्ताव सादर केला. डॉ. वंदना महाजन यांनी कालिना परिसरातील सर्व इमारतीच्या दुरावस्थेबाबत नाराजी व्यक्त केली. वारंवार तक्रारी करून देखील शैक्षणिक इमारती मध्ये स्वच्छता होत नाही. निवासी इमारती मध्ये स्लब कोसळत आहे, त्यांची दुरुस्ती करून देखील पुन्हा असेच प्रकार होत आहेत. त्यासाठी मा. कुलगुरूंनी प्रत्येक इमारती मध्ये भेट द्यावी, अशी विनंती केली. जेणे करून संबंधित विभागाना तात्काळ सूचना द्यावी. तसेच विद्यापीठ विभागांना परीक्षा घेण्यासंबंधी सर्व सुविधा उपलब्ध करून द्यावे, अशी विनंती केली.

**डॉ. विश्वंबर जाधव** यांनी उपरोक्त प्रस्तावास अनुमान दिले.

**डॉ. विनोद कुमरे** यांनी या प्रस्तावास जोडून मागणी केली की सध्या विभागात उपलब्ध संगणक, प्रिंटर, इंटरनेट कनेक्टिव्हिटी हि पर्याप्त नाही. त्यामुळे सदर भौतिक साधने उपलब्ध करून द्यावी. अशी विनंती केली.

**डॉ. वंदना महाजन** यांच्या स्थगन प्रस्तावास **मा. कुलसचिवांनी** उत्तर दिले. मा. कुलसचिवांनी माहिती देताना सांगितले की मुंबई विद्यापीठाचा कालीना परिसर किती मोठा आहे, या परिसरात किती प्रशासनिक, शैक्षणिक, निवासी इमारती आहेत. अधिकतर इमारती ह्या १९७९-८० मध्ये निर्माण केल्या आहेत. त्यामुळे सध्या त्यांना डागडुजी जास्त प्रमाणात करावी लागते. सन २०२३-२४ मध्ये निवासी इमारती मध्ये ९६ वेळा डागडुजी करण्यात आली याचे उदाहरण देखील त्यांनी दिले. आपल्या विद्यापीठचे इंजिनियर, अधिकारी आणि कर्मचारी त्यांच्या क्षमतेने सर्व काम करत असतात. अगदी मा. कुलसचिवानी देखील प्रत्येक्ष भेट देऊन अनेक तक्रारी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. तरी काही समस्या सोडविल्या गेल्या नसतील तर त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. विद्यापीठ प्रशासन विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत जागरूक आहे. आपल्या सर्व समस्या लवकरच सोडविण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल.

**मा. कुलगुरूंनी** याबाबत अधिक माहिती देताना सांगितले कि विद्यापीठ कायद्याप्रमाणे बिल्डिंग वर्क्स कमिटी या सर्व कामांचे देखरेख करते. ज्याच्यात एक एक्स्टर्नल इंजिनियर हे या क्षेत्रातील तज्ञ आर्किटेक्चर असतात. तसेच दोन तज्ञ पीडब्ल्यूडी विभागाचे हि चे देखील असतात. जे आपल्याला टेक्निकली गाईड करत असतात.विद्यापीठ कायद्यामध्ये स्पष्ट सूचना आहेत. प्रत्येक कामासाठी वरील समितीपुढे मान्यता घ्यावी लागते. त्या नंतर पुन्हा व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागते. हि मान्यता आल्या नंतर टेंडर प्रक्रिया असते. वास्तविकतः आपल्या कालीना परिसरातील अनेक इमारतीच्या जुन्या आहेत. त्यांच्या दुरुस्तीवर बराच खर्च होतो. आपण नवीन इमारती लगेच बांधू शकत नाही. कारण याबाबतीत लागणाऱ्या परवानग्या आणि निर्माण करण्यासाठी लागणारं निधी हे लगेच शक्य होणार नाही. समस्या सोडविण्यासाठी आपण विद्यापीठ फंडावर काही इंजिनियर घेतले आहेत. आणि प्रत्येक इंजिनियर कडे चार इमारतीची जबाबदारी देणार आहोत. त्यामुळे विविध विभागाचे प्रश्न प्रलंबित राहणार नाहीत. आंतराष्ट्रीय विद्यार्थी वसतीगृह देखील बांधण्यात आले आहे. प्रत्येक इमारती वर साधारण ४० ते ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. कालीना परिसर कार्बन मुक्त व्हावा यासाठी झिरो कार्बन योजनेवर आपण काम करत आहोत, या कामात अधिसभा सदस्य डॉ विश्वबर जाधव आणि डॉ सुशील कुमार जाजू सर देखील आहेत. मा. कुलसचिवांनी डॉ. वंदना महाजन यांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

**डॉ. वंदना महाजन** यांनी विनंतीस मान देऊन स्थगन प्रस्ताव मागे घेतला. तसेच त्यांनी नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीमच्या बाबत महाराष्ट्र शासनाचा शासन आदेशानुसार विद्यापीठ काय करणार आहे. यासंदर्भांत माहिती विचारली.

**मा. कुलगुरूंनी** याबाबत माहिती देताना सांगितले की सदर शासन निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेपुढे लवकरच ठेवण्यात येईल. तसेच यासंदर्भात कायदेशीर सल्ला घेऊन, योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने कुलसचिवांनी जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव (प्र)

प्र-कुलगुरु

कुलगुरु